# दत्तकपण #४
## जेफरसनविले, इंडियाना, अमेरिका
## ६०-०५२२संध्याकाळ

1 ...?... आमच्या बहुमूल्य मित्रांनो, आज रात्री आम्ही परत या मंडळीत येण्याने आनंदित आहोत. थोडेसे उकडत आहे, आणि त्यामुळे आम्ही जेवढे शक्य असेल तेवढी त्वरा करु, सरळ संदेशामध्ये जाऊ.

प्रथम, आम्हाला काही घोषणा करावयाच्या आहेत आणि - विशेष - प्रार्थना - विनंती. मला तुझे पत्र तेथे मागे मिळाले जे दिले गेले होते, आणि त्या बहिणीकरिता जिला वाटते की तिच्या मेंदूमध्ये गळू आहे, आणि तेथे लुईसवीलेमध्ये अजून एक आहे, आणि दुसरा सेवक भाऊ, त्याच्या - त्याच्या पित्याला हृदय विकाराचा झटका आला. आणि तेथे जगामध्ये आज कित्येक, कित्येक आजारी लोक आहेत. कितीतरी बोलावीत आहेत, आणि आम्ही निश्चितच आमच्या संपूर्ण हृदयाने त्यांच्यासाठी प्रार्थना करु, की देव आम्हाला साहाय्य करील.

2 सहसा सुमारे माझी ९५% सेवा ही नेहमी आजाऱ्यांसाठी प्रार्थना करणे आहे, तुम्ही पहा. परंतु माझा लहानसा एक प्रकारचा दृष्टिकोन आहे की.... मी अजूनही आजाऱ्यांसाठी प्रार्थना करतो, आता, हे लक्षात ठेवा. ते अगदी त्याच्या सोबतच जाते. परंतु, ओह, जर आपण मंडळीला जेथे ... ती योग्य पदावर असायला हवी तेथे आणू आणि क्रमात ठेवू जेणेकरुन आपण कार्य करु शकतो, तुम्ही पहा. एकत्र संघटित व्हायला हवे, सर्वकाही एकत्र असायला हवे.

काही मिनिटांआगोदर इतर कशानेतरी अगदी माझ्या हृदयाला स्पर्श केला. ते जेव्हा तो लहानसा वृद्ध अनुभवी मनुष्य, ज्याच्या बाहुंपैकी एक जवळ जवळ बंदुकीने उडविला गेला, पाय जवळजवळ बंदुकीने उडविला गेला.... तो येथे सभोवती नाही की अगदी आता माझे ऐकेल, परंतु खरा राजकुमार ज्याचे नाव रॉय रॉबर्सन आहे. आमच्या मंडळीतील विश्वस्तांपैकी एक आणि एक चांगला ख्रिस्ती सज्जन गृहस्थ. तो अगदी तेथे बसला, आणि म्हणाला, "भाऊ ब्रॅन्हम, राष्ट्राध्यक्षाला विसरु नका." म्हणाला, "मला खूप वाईट वाटते," जेव्हा त्याने त्याला दूरदर्शनवर विमानातून बाहेर उतरताना पाहिले, अश्रू त्याच्या गालावरुन ओघळत होते आणि त्याचे तोंड बाजूला वाकडे झाले होते. तुम्हाला माहित आहे तो अगदी तेथे रॉयबरोबर आणि त्यांच्याबरोबर त्या युद्धात होता.

3 काही फरक पडत नाही जर तुम्ही माझ्या बरोबर राजकारणात सहमत नसाल, तो तरीही आपला राष्ट्राध्यक्ष आहे. होय, महाशय. माझ्यासाठी, मी डेमोक्रॅट नाही किंवा रिपब्लिकन ही नाही; मी ख्रिस्ती आहे. परंतु मी तुम्हाला सांगतो, मला नक्कीच राष्ट्राध्यक्ष ड्वाईट आयसेनहोवरकरता मोठे कौतुक आहे. तो निश्चितच एक महान मनुष्य होता, माझ्या विचार करण्याच्या तऱ्हेने. जर तो परत उभा राहिला आणि मी मतदान करीत असेन, मी त्याला परत मतदान करीन. ते बरोबर आहे. मी पर्वा करीत नाही की जर तो शंभर वर्ष वयाचा होता तरीही मी त्यालाच मतदान करीन कारण मला तो आवडतो. आणि आज रात्री त्याला आपल्या प्रार्थनेत स्मरुया.

जे.टी. मी नक्कीच त्या चांगल्या सभेची प्रशंसा करतो जी तुम्ही सर्वांनी ... तुम्ही आणि भाऊ विलार्डने या आठवड्यात घेतली. जर मी बाहेरुन आतमध्ये आलो असतो तुम्ही सर्व म्हणाला असता, "ठीक आहे, भाऊ ब्रॅन्हम," तुम्हाला माहित आहे, "अमुक आणि अमुक." परंतु बरे होईल अगदी बाहेर उभे राहू आणि तुमचे ऐकू, तुम्ही नाही विचार करीत? फार चांगले.

4 माझ्याकडे काही मंडळ्यांसाठी काही प्रस्ताव आले आहेत जर तुम्हा सर्वांना ते हवे असतील. जर तुम्ही आता पाळक सेवा करण्यास जाण्यासाठी तयार आहात - जर तुम्हाला तुमचे प्रशिक्षण मिळाले असेल, जे मी विश्वास करतो तुमच्याकडे आहे, आणि सर्वकाही स्थिरस्थावर झाले आहे - माझ्याकडे एक ओरेगॉनमध्ये, काही वॉशिंग्टनमध्ये, आणि कॅलिफोर्निया, आणि ऍरिझोना, विभिन्न जागी आहे. आणि जर कधी तुम्हाला मंडळी किंवा काहीही घ्यायचे असेल, का अगदी येथेच सुरुवात करण्यासाठी चांगली जागा आहे. आणि तेथे सर्वत्र प्राण ओरडत आहेत, अगदी भारतीय आरक्षणात देखील. आणि जेथे कोठे तुम्हाला जायचे असेल, फक्त आम्हाला कळवा कारण मी विश्वास करतो की तुम्हा मुलांचा आता नांगर घातलेला आहे. बरोबर.

मला अगदी त्यांना ते करताना पाहण्यास आवडते. तेथे भाऊ रुडेल तेथे वर त्या रस्त्यावर आहे. काही दिवसात त्याच्याकडे सभा घेण्यास जात आहे. भाऊ रुडेलसाठी, संजीवन घेण्यास जात आहे. आणि मला लक्षात आहे मी त्या लहान माणसाला सभोवती सर्वत्र ढकलीत होतो, त्याला बाहेर काढून झुंपण्याचा आणि प्रचार करण्याचा प्रयत्न करीत होतो. तो इतका मागासलेला होता. तो म्हणत असे, "मी अगदी बोलू शकत नाही." तुम्ही त्याला ऐकावयास हवे. पहा, तुम्हाला माहिती नाही तुम्ही काय करु शकता जर तुम्ही पवित्र आत्म्याला तुमचा ताबा घेऊ दिला. ते बरोबर आहे.

5 युटिकामध्ये भाऊ ग्रॅहम स्नेलिंग आणि भाऊ जुनिअर जॅक्सन तेथे खाली, त्या सर्वांना आम्ही आमच्या सरळ आमच्याबरोबर लहान भगिनी मंडळ्या समजतो. आम्ही सर्व एकत्र आहोत. आम्ही आमच्या शिकवणीवर, आमच्या आशेवर, आमच्या ध्येयावर असहमत होत नाही. आमच्या शिकवणी एक आहेत. आम्ही एकत्र उभे राहतो, अगदी सर्वकाही एकत्र. आम्ही अगदी एक मंडळी आहोत. आणि आम्हाला त्या निश्चित सर्वत्र विखुरलेल्या हव्या आहेत. आमच्या काही आफ्रिकेत, काही भारतात, आणि देशभर सर्वत्र आहेत. तेथेच जेथे आम्हाला त्या वार्ता पसरवीत हव्या आहेत.

आणि मी या तरुण मुलांना येताना पाहत आहे, जसा भाऊ जे. टी. पर्नेल येथे, आणि भाऊ विलार्ड आणि ते. जेव्हा ते येत आहेत - तरुण मुले, जेव्हा मी वृद्ध होत आहे - जर तेथे उद्या असेल, ते ती उद्याची माणसे असतील. मला हा संदेश कधीच मृत झालेला नको. तो मरु शकत नाही; तो जगलाच पाहिजे. आणि मी विश्वास करीत नाही तो आणण्यासाठी आपल्याकडे खूप जास्त वेळ आहे.

ते लहानसे बाळ जे ते म्हणाले होते मरणार, मी पाहतो आज पूर्ण दिवस मंडळीमध्ये, बहिणी, ते तुझ्याकडे होते. ते फार चांगले आहे.

आम्ही प्रभूचे त्याबद्दल आभारी आहोत. प्रभू कृपाळू, दयेने भरलेला आहे. फक्त जे काही तुला येथे सरळ सांगितले ते विश्वास करीत रहा, पहा. ते ठीक होईल.

6 आता, तुम्ही शिक्षणाचा आनंद घेत आहात काय? तुम्हाला शिक्षण आवडते का? मी खरोखर विचार करतो ते आपले भले करते. ते आपल्याला आजाऱ्यांसाठी प्रार्थना करण्यापासून आणि दृष्टांत आणि दैवी आरोग्यापासून थोडा विसावा देते. अर्थात, आता आज रात्री, सभेनंतर आपण आजाऱ्यांसाठी परत प्रार्थना करणार आहोत. आपल्याला नेहमीच ते करायचे असते. कोणालाही कोणत्याही वेळी बाप्तिस्मा द्यायचा आहे.

किती जणांना लक्षात आहे मी विद्युत तारेच्या मागे चालत असे? ओह, मी सरळ विद्युत तारेच्या मागे कित्येक वेळेस चाललेलो आहे. जंगलामधून मला दिवसाला तीस मैल चालावे लागे. माझ्याकडे २८० मैल विद्युत तारेच्या मागे चालणे असे. मी तेथे खाली जात असे, माझ्या हातात सदरा घेऊन आणि, ओह, इतका थकलेला, त्या जंगलातून चालत, आणि हिरव्या काट्या कुत्र्यानां कापीत. कोणत्या वृद्ध शेतकऱ्याला भेटे आणि झाडाखाली बसून, त्याच्याशी प्रभू येशूच्या नावात बाप्तिस्मा घेण्याबद्दल बोलत असे. तो म्हणे, "बरे, मला नेहमीच बाप्तिस्मा घ्यायचा होता."

मी म्हणे, "खाडी येथून फार लांब नाही."

7 तो म्हणे....

आणि मी कितीतरी जणांना सरळ खाली तेथे नेले आणि त्यांना येशूच्या नावात बाप्तिस्मा दिला आहे. सरळ खाली रस्त्यावर नेले.... ते बरोबर आहे. कित्येक वेळा माझ्या जुन्या कामाच्या कपड्यात, एकाला बाप्तिस्मा दिला, सरळ खांबावरुन खाली उतरलो. तेथे वर खांबाच्या पलीकडे काम करीत उभा असे (मी तारायंत्राच्या तारा दुरुस्त करणारा, देखील होतो), खांबापलिकडे माणसाबरोबर काम करीत असे, त्याला प्रभूबद्दल बोलत असे. तो म्हणे, "बरे, बिली, यातील एक दिवस मी तुझ्या मंडळीत येत आहे आणि बाप्तिस्मा घेणार आहे."

मी म्हणे, "तुला का तेथपर्यंत थांबायचे आहे? आपण नदीजवळच आहोत. येथे सरळ भरपूर पाणी आहे." त्यांना सरळ आताच पकडा. ते बरोबर आहे. तोच वेळ असतो.

फिलिप्प म्हणाला....

8 षंढ फिलिप्पाला म्हणाला, "येथे पाणी आहे; आपल्याला काय अडखळण करते?" ते बरोबर आहे. काहीही नाही. जर तुम्ही तयार आहात, तोच समय असतो. सैतानाला तेथे काहीतरी पाचर मारण्याची संधी देऊ नका. ज्या गोष्टी तुम्ही आज करु शकता त्या उद्यावर टाकू नका. कदाचित तुमच्यासाठी उद्या येणार नाही. मला लक्षात आहे मी एका वेळेस ते केले होते. शिकलो ... मला धडा शिकविला. मी काहीतरी पुढे ढकलले जे मी एक दिवस करायला हवे होते, आणि दुसऱ्या दिवशी फार उशीर झाला.

9 आता, खरोखर, मला तुम्हाला सर्व वेळेसाठी ठेवायचे नाही, परंतु मी अगदी इतका यामध्ये गुंतून जातो आणि मला माहित नाही, मला इतके चांगले वाटते की मी अगदी भान हरपतो, जवळजवळ. मला अगदी इतके चांगले वाटते.

आता वचनाकडे जाण्यापूर्वी अगदी क्षणभर आपण आपली मस्तके झुकवुया.

आमच्या स्वर्गीय पित्या, तू जिवंत देव आहेस, सदाजीवी. सूर्य आताच अस्ताला गेलेला आहे, याच सूर्याकडे दानीएलाने पाहिले जेव्हा तो अस्त पावला, अस्ताला जाताना यिर्मयाने पाहिले, अस्ताला जाताना आदामाने पाहिले, येशूने त्याला अस्ताला जाताना पाहिले. आणि हेच ते जग आहे ज्यामध्ये ते जगले, आणि चालले, आणि तू आज ही तोच देव आहेस.

आज रात्री तेथे कित्येक विनंत्या आहेत. मनुष्य मेंदूवर गळू असलेला, बहिणीला त्याच गोष्टीची भीती वाटत आहे. त्यासाठी, तेथे केवळ तू एकच आशा आहेस, परमेश्वरा. तो गळू घातक झालेला आहे, तेथे काही नाही जे त्याला थांबवू शकेल. तो वैद्याच्या अगदी हाताबाहेर आहे. परंतु आज रात्री आम्ही आमच्या लहानशा गोफणीबरोबर त्या कोकरापाठी जातो, त्याला परत पित्याच्या कळपात आणण्यासाठी. प्रभू येशूच्या नावात आम्ही आमच्या प्रार्थनेला सिंहाकडे - गळवाकडे, घातक गोष्टीकडे पाठवीत आहोत - सुरक्षितपणे त्यांना कळपात आणण्यासाठी.

10 आणि आम्ही, देवा, आमच्या प्रेमळ राष्ट्राध्यक्ष, भावाची, आठवण कर, आमचा ड्वाइट आयसेनहोवर. प्रभू, त्याने देशाचे मार्गदर्शन केले आहे. त्याने आम्हाला युद्धापासून राखण्याचा प्रयत्न केला आहे. त्याने कोरियन युद्ध संपविण्याचे अभिवचन दिले जर तो कोणत्याही मार्गाने ते करु शकतो. त्याने त्या मातांना त्यांची मुले परत आणण्याचे अभिवचन दिले. परंतु तो म्हणाला, "माझ्यासाठी ते करणे, मी ते करु शकत नाही. मी माझे प्रयत्न करु शकतो, परंतु केवळ देवाला ते करणे आहे." तू त्याच्याबरोबर होतास, प्रभू, आणि आता ते सर्व स्थिरस्थावर झाले आहे. प्रथम ते का नाही ते पाहू शकले? देवा, मी प्रार्थना करतो की तू त्याला साहाय्य करशील. त्या धाडसी प्राणाला तू आशीर्वादित कर, प्रभू. आणि आम्ही प्रार्थना करतो की पुढे येणाऱ्या नेत्याला तू आमच्यासाठी निवडशील. तुझा पूर्वनिर्धारित केला जाईल, प्रभू.

परंतु एक ज्यामध्ये आज रात्री आम्ही इतके स्वारस्य ठेवून आहोत, आमच्या राष्ट्रीय बाबीच्या व्यतिरिक्त, जो तो महान आणि एक गौरवी असा जो राज्य स्थापित करण्यासाठी येत आहे ज्याचा अंत नसेल: प्रभू येशू, तुझा पुत्र. मग ते युद्ध शस्त्रात्रांची रास करतील, तुतारी फुंकली जाईल आणि त्यापुढे कधीही युद्ध असणार नाही. ते द्राक्षमळा लावतील आणि त्याची फळे खातील. ते घरे बांधतील, त्यामध्ये राहतील. आणि त्यानंतर, मग तेथे अजून त्रास असणार नाही.

जेव्हा आम्ही वचनाकडे जात आहोत आम्हाला आशिर्वादित कर. आणि, पित्या, तुला ठाऊक आहे कारण की मी या प्रत्यक्ष शास्त्रलेखाच्या

वचनाकडे जात आहे. त्याचे कारण की मला वाटते तुला मी अशा प्रकारे करावे असे वाटते, की ही तुझी दैवी इच्छा आहे. हे तुझ्या आदेशात आहे, ते ... हे या दिवसाप्रमाणे आहे, की लोकांनी त्यांची योग्य जागा शोधावी आणि घडीच्या युद्धासाठी तयार व्हावे. जसे आमच्या भावाने तुला त्याच्या प्रार्थनेत अलीकडेच सांगितले, "ओह, प्रभू, तू आम्हाला दीर्घकाळ प्रशिक्षण दिले आहे." आता, पित्या, आम्हाला आमचे पद दे. आम्हाला तेथे बाहेर जे आम्ही करावयास हवे तेथे ठेव, जेणेकरुन आम्ही पित्याचे काम करावे. कारण आम्ही ते, तुझा पुत्र, येशूच्या नावात मागतो. आमेन.

11 ही दुपार खरंतर अद्भुत होती, बोलत होतो ... एका नावाजलेल्या वैद्याशी लुईसवीलेतील, त्याची परिचारिका. त्यांनी देवाच्या गौरवी गोष्टींबद्दल ऐकले. आणि तिचा पिता हा वैद्य आहे. आणि ती तेथे आली आणि माझ्या खोलीत बहुतांश दुपार बसली. सहज आत आली, अनपेक्षितपणे आली. अद्भुत व्यक्ती. खरंतर थोडीशी कठीण - तुम्हाला माहित आहे, एक प्रकारची कट्टर जात्याच, खरी प्रेसबायटेरियन सुरुवातीपासूनच - परंतु गालावर अश्रू ओघळत परतली.

ओह, वैद्याच्या कार्यालयात, सर्वत्र अगदी चिकटलेल्या त्या देवाच्या आहेत, आणि.... परिचारिका - मी विश्वास करीत नाही नॉर्टन्स इन्फर्मरी दवाखान्यात तेथे कोणी परिचारिका आहे जिला मी पवित्र आत्मा असण्याबाबत साक्ष दिली नाही, आणि तिला विचारले जर ती येशूच्या नावात बाप्तिस्मा झालेली होती. कोणी वैद्य नाही जो माझ्या संपर्कात आला नाही, कुठेही, नाही, पहा.

त्यांना याबद्दल सांगा. भावा, आपल्याकडे खूप वेळ राहिलेला नाही. काही फरक पडत नाही येथे किती कठीण भासते, फक्त शेवटचा श्वास पलीकडे जाईपर्यंत थांबा आणि, पहा, मग तुम्ही इच्छा कराल तुम्ही ते केले असते. होय, महाशय. त्या समयापर्यंत थांबू नका; ते आताच करुया. ही घडी आहे. ओह, ते कदाचित असहमत असतील, आणि त्याबद्दल थोडेसे संतप्त होतील आणि गडबड करतील, परंतु त्यांना तसे करायचे नसेल. त्यांना खरोखर तसे करायचे नसेल. ते ठीक आहेत. जेव्हा ते तुमच्या बरोबर गडबड करतील, फक्त लक्षात ठेवा, त्यांना खरोखर तसे करायचे नसते. त्यांना तसे करायचे नाही. त्यांना कदाचित अगदी काहीतरी शिकविले गेले असेल आणि ते फक्त त्याला धरुन राहत असतील. तेव्हा, तुम्ही त्यांच्या कल्पना पाहू शकता. त्यांच्याबरोबर भांडू नका. कोणाबरोबर ही भांडू नका, परंतु फक्त यामध्ये त्यांना प्रेम करा. मग त्यांच्यासाठी प्रार्थना करा.

12 बरे, मी विचार करतो आपण नवव्या पदापर्यंत गेलेलो आहोत. मी निश्चित नाही. ते तिसऱ्या अध्यायापासून फार दूर आहे, ते नाही का, लोकांनो? ओह, माझ्यासाठी तो खडकातील मध आहे! आता आपण बोलत आहोत, लक्षात ठेवा, जेणेकरुन परत आपल्याला थोडीशी पार्श्वभूमी मिळेल.... (आणि आता, भाऊ नेविल, जर मी वेळ निघून जाताना पाहण्यास चुकलो, तू मला थोडेसे ओढ, जेणेकरुन मी आजाऱ्यांसाठी प्रार्थना करु शकेन.) आपल्याला प्रत्येक लहान कण जो आपण घेऊ शकतो घ्यायला हवा. आणि आज रात्री मला वेदीवर बोलावयाचे आहे. यावर शेवट करताना, जे मी बाकीचे फक्त वाचू शकेन.

परंतु याचा हेतू तुमचे ख्रिस्तामधील पद पाहणे आहे; असे पाहणे की ते काहीतरी असे नाही की तुम्ही त्याच्यामध्ये धडपडलात, किंवा काहीतरी जे ... तुम्हाला कुठेतरी गुणवत्तेने मिळाले आहे; परंतु ते जे काही देवाने तुमच्यासाठी केले आहे, स्वतः. असे नाही की तुम्ही खूप चांगले होता की एके रात्री तुम्ही मंडळीत गेलात, की कोणत्या गरीब भावाने तुम्हाला वेदीपर्यंत नेतृत्व केले. ते तसे नव्हते. तो देव होता, जगाच्या स्थापनेपूर्वी, अनंत जीवनासाठी तुम्हाला पूर्वनिर्धारित केले. जेव्हा त्या दिवशी तुम्ही तेथे गेलात....

यात आश्चर्य नाही की चाळीस ... चोवीस वडिलांनी त्यांचे मुकुट काढले, सर्वांनी त्यांचे मुकुट खाली ठेवले, सर्वजण उपडे पडले. त्यांच्याकडे एक ही गोष्ट नव्हती जी ती सांगू शकत होते, प्रचारक नाही, वडील नाही, काहीही नाही. सर्वांनी कोकऱ्याची स्तुती केली! त्या दिवशी देव त्याच्यामध्ये सर्व गोष्टी एकत्र करील. ओह, जर आपल्याला कधी कळले, आणि तो कोण होता, कोणाला त्यांनी वधस्तंभावर दिले, ते ओळखू!

आता यावर ...

13 आपण आठव्या पदावर सुरुवात करु, थोडीशी पार्श्वभूमी कळण्यासाठी:

सर्व ज्ञान व बुद्धी ह्यांच्यासह त्याने ही कृपा आपल्यावर विपुलतेने केली आहे;

त्याने स्वतःच्या इच्छेनुरुप स्वसंकल्पाचे रहस्य आपल्याला कळविले....

"त्याच्या स्वसंकल्पाचे रहस्य." लक्षात आहे कसे आपण त्यावर ताटकळत होतो? या सकाळी येथे कितीजण होते? पाहूया. "त्याच्या स्वसंकल्पाचे रहस्य," यावर आपण कसा प्रहार केला. आता ती फक्त लहानशी गोष्ट नाही; मग ते रहस्य आहे. देवाची इच्छा हे रहस्य आहे. आणि प्रत्येक माणसाला तिच्यासाठी किंवा त्याच्यासाठी देवाची इच्छा शोधून काढणे आहे, देवाचे रहस्य.

आपण कसे शोधणार? पौल, त्याला ते कळविले गेले. तो म्हणाला त्याने कोणत्या माणसाची मसलत घेतली नाही, मांस नाही आणि रक्त नाही. तो कोणत्या ही शाळेत गेला नाही, कोणत्या विद्यालयात गेला नाही. त्याला त्याच्याशी काही कर्तव्य नव्हते. परंतु ते त्याला येशू ख्रिस्ताद्वारे प्रकट करण्यात आले होते, जो त्याला दिमिष्काच्या रस्त्यावर अग्निस्तंभाच्या प्रकाशामध्ये भेटला, आणि त्याने त्याला पाचारण केले.

आणि तो अरबस्तानात निघून गेला, आणि तेथे तीन वर्ष राहिला. ओह, भाऊ इगन, तू विचार करीत नाही का तो काही समय होता? तीन वर्ष, पौल तेथे खाली अरबस्तानात. स्वतःसाठी कामचलाऊ म्हणून लहानशी कुठेतरी झोपडी उभारली. जमिनीवर वर खाली चालत होता, त्या सर्व जुन्या गुंडाळ्यासोबत.... त्यांच्याकडे नवीन नव्हत्या. बहुतांश, पौलाने त्या लिहिल्या.

सरळ या जुन्या गुंडाळ्यामधे, कसे की देवाने प्रारंभी आपल्याला अनंत जीवनासाठी पूर्वनिर्धारित केले होते, कसे तो येशूला पाठविणार होता, की या बलिदानाद्वारे आपल्या सर्वांना जीवनाच्या झाडावर अधिकार मिळणार होता. ज्यांचे त्याला पूर्वज्ञान होते, त्याने पाचारण केले; ज्यांना त्याने पाचारण केले, त्याने अगोदरच नीतिमान ठरविले; ज्यांना त्याने नीतिमान ठरविले, त्यांना अगोदरच गौरविले आहे. देवाने, जगाच्या प्रारंभापासून, आपल्याला पुत्राच्या दत्तकपणासाठी पूर्वनिर्धारित केले आहे. आता संपूर्ण सृष्टी, देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याची, वाट पाहत कण्हत आहे. ओह, मी कल्पना करतो पौलाकडे अद्‌भुत समय होता. मला त्याच्याबरोबर तेथे असायला आवडले असते. तुम्हाला नाही का?

14 आता तो म्हणाला, "त्याने आपल्याला रहस्ये कळविली आहेत." कधीतरी तुमच्यावर पवित्र आत्मा येऊ द्या, आणि त्याने धावायला सुरुवात करु दे, आणि फक्त निरीक्षण करा तो कसा जातो. या दुपारी माझ्याकडे होता, ओह, अभ्यासासाठी सुमारे तीस मिनिटे, फक्त धड्याकडे पाहण्यासाठी. कदाचित नाही. मी म्हणेन त्यातील अर्धा, वेळेमध्ये पंधरा मिनिटे. आणि मी धावू लागलो, आणि मी विचार केला, "रहस्य - किती रहस्यमय!" आणि शास्त्रलेखाने मला मागे जुन्या करारात नेले, मग परत नव्या करारामध्ये; कशालातरी एकत्र बांधले त्याच्या आगमनाचे रहस्य पाहण्यासाठी, त्याच्या स्वसंकल्पाचे रहस्य, आपण एकत्र बसलेले आहोत त्याचे रहस्य.

लक्षात ठेवा, हे कोणत्याही विद्यालयात शिकविले जाऊ शकत नाही. ते रहस्य आहे. शिक्षणाद्वारे ते तुम्हाला समजू शकत नाही, धर्मशास्त्राद्वारे. हे रहस्य जगाच्या स्थापनेपासून गुप्त राखले गेले होते, देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याची वाट पाहत होते.

15 माझ्या भावा, मला सांग, माझ्या बहिणी, मला सांग, आता या समया व्यतिरिक्त देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याचा कधी समय होता? इतिहासात कधी असा समय होता ... सृष्टीच्या सुटकेचा समय प्रकट झाला? सृष्टी, स्वतः सृष्टी, कण्हत आहे, प्रकट होण्याच्या समयाची वाट पाहत आहे. का, प्रायश्चित करण्यापूर्वी, पवित्र आत्म्याच्या वर्षावापूर्वी, सर्व जुन्या कराराअगोदर, तेथे खाली, तेथे प्रकट होणे असू शकत नव्हते. या वेळेपर्यंत त्याला थांबणे होते. आता सर्व गोष्टी आणल्या गेल्या आहेत, येत आहेत, कळसापर्यंत आकार घेत आहेत, देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्यापर्यंत, परतत आहेत; आणि देवाचा आत्मा या मनुष्यांमध्ये इतक्या उत्तम प्रकारे येत आहे की शेवटी त्यांची सेवा ही ख्रिस्ताच्या इतकी निकट असेल की ती शेवटी त्याला आणि त्याच्या मंडळीला एकत्र जोडील.

16 किती जणांनी कधी पिरॅमिडच्या इतिहासाचा अभ्यास केला आहे? मी अंदाज करतो कदाचित एका महिलेने येथे तिचा हात वर केला. ठीक आहे.

देवाने तीन पवित्रशास्त्रे लिहिली. त्यातील एक आकाशातील राशीचक्र होते. ते पहिले पवित्र शास्त्र आहे. माणसाला जाणीव होण्यासाठी वर पाहणे होते की देव वरचा आहे. राशिचक्राला अनुसरा. तुम्ही कधी त्याचा अभ्यास केला आहे? ते अगदी प्रत्येक युग देते, अगदी कर्क युग. ते प्रारंभ देते, ख्रिस्ताचा जन्म. राशीचक्रातील पहिली आकृती काय आहे? कुमारी. शेवटची आकृती काय आहे? लिओ सिंह. ख्रिस्ताचे पहिले आणि दुसरे आगमन, सर्वकाही येथे लिहिलेले आहे.

मग दुसरे पवित्रशास्त्र दगडात लिहिले गेले, ज्याला पिरॅमिड म्हणतात. देवाने पिरॅमिडमध्ये लिहिले. जर तुम्ही त्याचा अभ्यास कराल, प्राचीन इतिहासाचा आणि युद्धाचे निरीक्षण करा, कसे ते प्रलयापूर्वी नाशा अगोदर बांधले गेले....

17 तिसरे - पवित्रशास्त्र - येणाऱ्या महान, चलाख, बौद्धिक जगासाठी, कागदावर लिहिले गेले. आता, जसा देव युगातून पुढे गेला, आपण लिओ सिंह युगात आहोत. आपण पिरॅमिडच्या शिखराच्या वर आहोत. आपण प्रकटीकरणाच्या पुस्तकात आहोत, शेवटच्या अध्यायात. विज्ञान म्हणते आपण मध्यरात्री अगोदरच्या तीन मिनिटात आहोत. ओह, आपण कुठे आहोत याचा विचार करा!

आणि लक्ष द्या, पिरॅमिड घेऊ या. ते सोपे आहे. ते एक प्रकारे त्रिकोणात फिरते.

जेव्हा आपण येथे खाली होतो, मंडळीच्या प्रारंभाच्या युगाच्या सुरुवातीला, लूथरच्या समयाच्या सुधारणूकीनंतर, फक्त मनुष्याने असे म्हणणे की तो ख्रिस्ती आहे, ते त्याचे जीवन किंवा मरण होते. ते अगदी त्याने तो ख्रिस्ती आहे असे म्हटल्यावर ही त्याला ठार करीत असत. त्यामुळे छळातून जाणे ... प्रत्येक युग, प्रत्येक समयी, तेथे छळ होता. "ते सर्व जे ख्रिस्त येशूमध्ये सुभक्तीने आयुष्यक्रमण करावयास पाहतात त्या सर्वांचा छळ होईल." लूथरच्या युगामध्ये "लूथरन" म्हणणे भयंकर होते. तो धर्मवेडेपणा समजला जाई, आणि ठार केले जाई. कित्येक वेळेस ते त्यांना जाळून मारीत असत, त्यांना जाळीत असत, आणि सर्वकाही, "लूथरन लोकांसाठी."

18 मग मंडळी, पिरॅमिडसारखी, अरुंद झाली. ती अजून एका कृपेच्या पायरीवर आली, जी पवित्रीकरण होती - वेस्लीचा समय, जेव्हा त्याने अँग्लिकन मंडळीचा विरोध केला, पवित्रीकरण शिकविले. परत ती अल्पसंख्येत आली, मग त्यांना धर्मवेड्यांचा समूह म्हणण्यात आले.

कितीजण येथे जे मेथडिस्ट होते, किंवा असत होते, किंवा एका वेळेस मेथडिस्ट मंडळीशी जोडलेले होते? तुमच्यातील अर्धे. तुम्हाला माहित आहे एका वेळेस मेथडिस्ट मंडळीमध्ये जवळजवळ पवित्र आत्मा होता? मी मेथडिस्ट मंडळीत गेलेलो आहे आणि त्यांना जमिनीवर पडताना पाहिले आहे, आणि ते त्यांच्या तोंडावर पाणी फेकत आणि पंख्याने त्यांना हवा घालीत, पवित्र आत्म्याला त्यांच्यावर येण्यापासून रोखत. ते बरोबर आहे. आता, ते सत्य आहे - कंटकी टेकडीच्या खाली, जेथे आमच्याकडे मेथडिस्ट होते. तुम्ही मुले बाहेर येथे मंडळीत सामील होणार होते; आमच्याकडे तेथे मागे मेथडिस्ट होते, आणि बॅप्टिस्ट होते. आम्ही वेदीवर खाली येत असू आणि एकमेकांना पाठीत मारीत असू जोपर्यंत आम्हाला काहीतरी मिळत नव्हते. आम्ही त्यामधून आलो - आम्ही त्यानंतर भिन्न जगलो.

परंतु तुम्ही फक्त या, आणि तुमचे नाव पुस्तकात टाका, आणि म्हणा, "मी मेथडिस्ट आहे," आणि मिठाची बाटली घ्या आणि थोड्याश्या पाण्याचा तुमच्यावर वर्षाव करा, आणि बस एवढेच काय ते. बाहेर जा आणि तोकड्या विजारी घाला, शृंगार करा, घोड्याच्या शर्यतीत जा, पैज

लावा, जुगार खेळा, स्लॉट मशिनीवर खेळा आणि सर्वकाही - तरीही चांगला मेथडिस्ट, पहा. तो मेथडिस्ट नाही; तो केवळ मंडळीत जोडला गेलेला आहे. ते बरोबर आहे. बॅप्टिस्ट, त्याच प्रकारे. प्रेसबायटेरियन, खाली, त्याच प्रकारे.

19 जसा डेविड डुप्लेसिस म्हणाला, "नातवंडे - देवाला कोणतीही नातवंडे नाहीत." देवाला कधीही नातवंडे नव्हती. त्याला पुत्र आहेत, परंतु नातू नाहीत. ते बरोबर आहे. आणि लोक जे मेथडिस्ट मंडळीत येतात - किंवा पेन्टिकॉस्टल मंडळीत, किंवा बॅप्टिस्ट मंडळीत - कारण तुमची आई किंवा वडील पेन्टिकॉस्टल किंवा बॅप्टिस्ट होते, मग तुम्ही नातू आहात. ते पुत्र होते; तुम्ही नातू आहात, पहा. तेव्हा देवाकडे अशा प्रकारे काही नाही. मंडळीकडे असे खूप काही आहे, परंतु ... देवाकडे नाही.

20 आता, हे निरीक्षण करा, जोपर्यंत हे खाली येते, मंडळी, अल्पसंख्येत येते. पेन्टिकॉस्टल युग आले. त्याने नक्कीच खूप गाजावाजा केला. मग त्याने काय केले? त्याने अगदी मेथडिस्ट आणि लूथरन, सर्वांना मागे टाकले.

आता पवित्र आत्मा सरळ पुढे गेला पेन्टिकॉस्टल युगापासून दूर गेला. त्यांनी काय केले? ते संस्थागत झाले, स्वतःला बनविले.... "आम्ही असेम्ब्ली ऑफ गॉड आहोत. आम्ही एकत्व वादी आहोत. आम्ही द्विवादी आहोत. आम्ही चर्च ऑफ गॉड आहोत. आम्ही 'हे किंवा ते' आहोत. तुम्ही त्याच्या मालकीचे नाहीत - आमच्या पुस्तकातून तुमचे नाव असल्याशिवाय तुम्ही स्वर्गात जाऊ शकत नाही." ओह, असा मूर्खपणा! मी पर्वा करीत नाही जर तुम्ही बॅप्टिस्ट, मेथडिस्ट, प्रेसबायटेरियन आहात. तुम्ही तुमचे नाव जीवनाच्या पुस्तकात टाकता जेव्हा देव ते तेथे टाकतो.

जर तुम्ही अनंत जीवनासाठी पूर्वनिर्धारित होते, देव तुम्हाला, कसेहीकरुन, एका मार्गाने किंवा दुसऱ्या, कोणत्यातरी मार्गाने बोलाविल. तो निश्चित बोलाविल. "पित्याने दिलेले सर्व माझ्याकडे येतील." काही फरक पडत नाही तुम्ही कोणत्या मंडळीच्या मालकीचे आहात, त्याच्याशी त्याला काही कर्तव्य नाही. परंतु संप्रदाय तुम्हाला एक ही गोष्ट करणार नाही, परंतु देवाबरोबर जाण्यासाठी तुम्हाला खूपच अडखळण करील, परंतु ती दुसरे काही करणार नाही. तुम्हाला विश्वासू आणि अविश्वासूंच्या घोळक्यात एकत्र करील. अर्थात तुम्ही जेथे कोठे जाता तुम्हाला ते सापडतात, आणि ते अगदी तेथे स्वर्गात ही होते, तेव्हा.... ते ठीक आहे, परंतु तुम्ही तुमच्या संप्रदायाकडे पाहत आहात. येशूकडे पहा. तो एक आहे ज्याकडे पाहावयास हवे.

21 आता जसे आपण सरळ खाली येतो.... किती जण...? मी विश्वास करतो या स्त्रीने येथे हात वर केला होता की तू पिरॅमिडचा अभ्यास केला आहे. तुला ठाऊक आहे, पिरॅमिडला कधीच आच्छादन घातले गेले नाही, होते का? त्याच्यावर कधीच कळसाचा दगड ठेवला गेला नव्हता. त्यांनी कधीही.... तो अगदी शोधू ही शकत नव्हता. त्यांना ठाऊक नाही त्याचे कधी काय झाले. का? का त्याच्यावर कळसाचा दगड ठेवला गेला नाही, शिखराचा दगड, त्याचा माथा? कारण जेव्हा तो आला त्याला नाकारले गेले. तो नाकारलेला दगड होता. ते बरोबर आहे. परंतु तो आच्छादला जाईल. ते बरोबर आहे.

आणि मग ते दगड जे त्या माथ्याच्या दगडा सभोवती रचले जाणार आहेत ते अगदी पूर्णपणे त्या दगडासारखे असतील जे रचले जातील, जोडतील आणि सर्वत्र. पिरॅमिड इतका परिपूर्ण आहे तुम्ही ब्लेडचे पाते त्याच्यामधून फिरवू शकत नाही, जेथे ते दगड एकत्र असतात - इतके सुंदर दगडी बांधकाम. त्यातील काहींचे वजन शेकडो टन असतील, वर आकाशात, आणि इतक्या उत्तम प्रकारे रचले गेले आहेत.

22 त्याच प्रकारे देव त्याची मंडळी आणीत आहे. आपण एकत्र एकमेकांना जोडले गेलेले आहोत, एका हृदयाने आणि एका मताने. आता कोणीतरी म्हणेल, "बरे, मागे तेथे लूथरनांकडे काही नव्हते." तुम्ही त्याचा विश्वास करु नका. लूथरन देखील पुनरुत्थानात येतील अगदी त्याच प्रमाणे जसे इतर पुरुत्थानात येतील. बॅप्टिस्ट, प्रेसबायटेरियन, आणि देवाची सर्व मुले त्या पुनरुत्थानात येतील. आणि तेच कारण आहे आज.... लोक म्हणतात, "ओह, बरे, तेथे झाडणारे संजीवन येईल जे येथे बाहेर जाईल आणि शेकडो दशलक्ष पेन्टिकॉस्टल लोकांना वाचवेल. ते सर्व वाचले जातील आणि तेथे रुपांतर येईल." तुम्ही चुकलेले आहात. ते रुपांतर शेकडो आणि हजारांचे असेल, ते बरोबर आहे; परंतु ते सहा हजार वर्षातील तारणाचे देखील बनवलेले असेल, मागील सहा हजार वर्ष.

मनुष्य प्रकाशात चालतो जसा प्रकाश त्याच्याकडे येतो. जेव्हा तो त्यांच्याकडे येतो तो पूल ओलांडतो. आता, जर तो त्याला नाकारतो, मग तो अंधकारात राहतो. परंतु जर तो पुढे जात राहतो....

23 आता, लक्ष द्या, मग प्रभू येशूचे आगमन इतके निकट आहे हाताशी की आत्मा ... खालून सरळ येथे (फक्त केवळ नीतिमान ठरणे, पवित्रीकरण, पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा), आणि आता सरळ शिखराचा दगड येण्याच्या समयात. मंडळीला इतके उत्तमरीत्या ख्रिस्तासारखे होणे आहे की ख्रिस्त आणि मंडळी एकत्र जुळू शकेल, तोच आत्मा. आणि जर ख्रिस्ताचा आत्मा तुम्हामध्ये आहे, तो तुम्हाला ख्रिस्ताचे जीवन जगावयास लावील, ख्रिस्ताचे जीवन वर्तावयास लावील, ख्रिस्ताची कृत्ये करावयास लावील. "तो जो माझ्यावर विश्वास करतो, जी कृत्ये मी करतो तो देखील करील." येशू ते म्हणाला, पहा. आता आपल्याकडे असणार आहे ... आपल्याकडे सेवा येत आहे जी अगदी तंतोतंत ख्रिस्ताच्या जीवनासारखी असेल. ती सेवा कसली ओळख देते? प्रभूच्या आगमनाची.

आज जगामध्ये पहा आणि निरीक्षण करा ख्रुश्चेव काय म्हणत आहे, या सर्व इतर महान गोष्टी, आणि महान जागतिक संघर्ष अगदी हाताशी आहेत. कोणत्याही समयी राखेत जाईल, कोणत्याही क्षणी. ते बरोबर आहे. आणि आपल्याला ठाऊक आहे की ते निकट आहे. कोणतीही समंजस व्यक्ती ते वर्तमान पत्रात वाचू शकते किंवा रेडिओवर ऐकू शकते, तिला कळेल की ते निकट आहे. बरे, लक्षात ठेवा, ते होण्याअगोदर ख्रिस्त त्याच्या मंडळीसाठी येत आहे. तेव्हा प्रभू येशूचे आगमन किती निकट आहे? कदाचित आज रात्री ही सभा संपण्याअगोदर. आपण अंत समयात आहोत. नक्कीच सत्य.

24 मंडळीला पहा जशी ती येत आहे, जशी ती पुढे जात आहे. अगदी तुमच्या स्वतःच्या मनामध्ये घ्या, तुम्ही इतिहासकार जे इतिहासाचा

अभ्यास करता. नीतिमान ठरण्याअंतर्गत लूथरन मंडळीकडे पहा, जो अगदी नव्याने कॅथोलिक वादातून येत आहे. तिला पुढे जाताना पहा. मग वेस्लीला थोडेसे निकट येताना पहा, पवित्रीकरणामध्ये, शास्त्रलेखात विणताना. अगदी आतमध्ये सरळ, वेस्लीला पहा. मग पुढची गोष्ट आत येते ते पेन्टिकॉस्टल युग होते - आणि पेन्टिकॉस्टल युग वरदानाच्या पुनःस्थापनेसोबत, आत्मिक वरदाने. आता, युगाला पहा जे सरळ शिखराच्या दगडाकडे येत आहे. पहा मला काय म्हणायचे आहे? प्रभूचे आगमन, ज्ञात केले जात आहे. देव आणि सर्व सृष्टी, मंडळीने तिची योग्य जागा शोधावी यासाठी वाट पाहत आहे.

25 आजचा त्रास, प्रत्येक जनाला अगदी मी भेटतो.... मला बाहेर काढले जाते, आम्ही घेत होतो.... मला परदेशी जाण्यासाठी, तुम्हाला माहित आहे, शारीरिक चाचणी द्यावी लागते. तुम्ही धर्मप्रचारक आणि इत्यादींना ते ठाऊक आहे. जेव्हा माझी चाचणी चालली होती, त्यांनी मला तेथे खोलीबाहेर आणले. मी ते जुने - मला असे दिसत होते की पिठाच्या अन्नासारखे किंवा काहीतरी, मी पीत होतो - आणि ते मी पीत होतो. आणि तेथे बाहेर आलो, खाली बसलो, अर्ध्या तासासाठी थांबलो पाहण्यासाठी की ते माझ्या पोटात गेले किंवा नाही.

मी तेथे पलीकडे पाहिले, आणि तेथे कोणी लहानशी स्त्री होती, असे दिसत होते की ती अगदी आता मरणारच होती. ती इतकी ... लहानसे पाय आणि लहानसे हात. आणि मी या माणसाकडून त्या माणसाकडे, ह्या माणसाकडून त्या माणसाकडे जात होतो, तिच्या निकट जात होतो, की शेवटी जेथे ती होती तेथे मी गेलो. ती अशी दिसत होती गरीब बिचारी मरणारच होती. आणि मी तिच्या जवळ गेलो, मी म्हणालो, "मला माफ करा, बाईसाहेब."

ती म्हणाली, "तुम्ही कसे आहात?" ओह, ती इतकी आजारी होती!

आणि मी म्हणालो, "काय चुकीचे आहे?"

ती म्हणाली, "मी टुसनमध्ये माझ्या मुलीला भेटण्यासाठी गेले. मी आजारी झाले. काय चुकीचे आहे ते शोधू शकत नाही."

मी म्हणालो, "एक गोष्ट मला तुला विचारावयाची आहे." मी म्हणालो, "मी सुवार्तेचा प्रचारक आहे. तू ख्रिस्ती आहेस का? तू जाण्यासाठी तयार आहेस का जर ती वेळ आलेली असेल?"

आणि ती म्हणाली, "मी अमुक आणि अमुक मंडळीच्या मालकीची आहे."

मी म्हणालो, "मी तुला तो प्रश्न विचारलेला नाही. तू ख्रिस्ती आहेस का, देवाच्या आत्म्याने भरलेली, आणि जेव्हा तो बोलाविल तेव्हा जाण्यासाठी तयार आहेस?" स्त्रीला अगदी ठाऊक ही नव्हते मी कशाबद्दल बोलत होतो, पहा. ओह, जग काय एका दयनीय दृश्यात आहे!

26 आता, "...त्याच्या स्वसंकल्पाचे रहस्य आपल्याला कळविले," आगमन.... मला तुमच्यासाठी काहीतरी वाचू द्या. मी वाचीत होतो ... आता त्याच्या स्वसंकल्पाच्या रहस्यामध्ये वळूया. इब्रीमध्ये, येथे, अगदी एका मिनिटासाठी, वळूया. इब्रीचा सातवा अध्याय, मी विश्वास करतो तो आहे. मला तुम्हाला काहीतरी वाचावयास सांगायचे आहे जे तुम्हाला अगदी इतके चांगले वाटेल जेव्हा आपण विचार करतो की आपण एकत्र स्वर्गीय स्थानात बसलेलो आहोत. इब्री, सातवा अध्याय:

कारण हा मलकीसदेक [आता लक्ष द्या], शालेमाचा राजा, परात्पर देवाचा याजक होता....

27 आता काय रहस्य आहे? येथे रहस्य आहे, हे पहा. हा मनुष्य कोण आहे? त्याच्या स्वसंकल्पाचे रहस्य कळवीत आहे.... हा मलकीसदेक.... (मी येथे सर्वांसाठी थांबलेलो आहे - अजूनही पवित्र शास्त्राची पाने वळवीत आहे.) इब्री, सातवा अध्याय, पौल बोलत आहे, गलतीकरांसचा तोच मनुष्य:

कारण हा मलकीसदेक, शालेमचा राजा, परात्पर देवाचा याजक होता, ... अब्राहाम जेव्हा राजांस ठार मारुन परत आला तेव्हा ह्याने त्याला सामोरे जाऊन, आशीर्वाद दिला व;

अब्राहामाने त्याला सर्व लुटीचा दशमांश दिला; तो आपल्या नावाच्या अर्थाप्रमाणे एक तर नीतिमत्वाचा राजा, ... आणि दुसरा ... शालेमचा राजा [हा मनुष्य कोण आहे?], म्हणजे, शांतीचा राजा होता;

त्याची माता, पितरे, वंशावळ, जन्मदिवस, अथवा त्याच्या आयुष्याचा शेवट नाही....

28 हा मनुष्य कोण होता? तो कोण होता? त्याला कधीही पिता नव्हता, त्याला कधीही माता नव्हती. त्याला कधीही सुरुवात नव्हती, किंवा तो कधी मरेल असा त्याच्याकडे कधी समय नव्हता. अब्राहाम राजांना ठार करुन परतल्यावर तो त्याला भेटला. तो काय करीत होता? तो लोटाला, त्याच्या नाशात गेलेल्या भावाला, परत आणण्यासाठी बाहेर गेला. आणि त्याने राजांना ठार मारले, जे, ते राजे ठार मारले, मी विश्वास करतो, त्यांच्या राज्यातील दहा किंवा पंधरा राजे होते. परंतु अब्राहामाने त्याच्या दासांना शस्त्रास्त्रे देऊन, त्याच्यापाठी गेला, रात्री स्वतःला वेगळे केले. पहा केव्हा त्याने त्याला पकडले? रात्रीच्या वेळेस. ओह, भावा, आपण आता अंधकारात कार्य करीत आहोत. केवळ प्रकाश आपल्याकडे आहे तो सुवार्तेचा प्रकाश आहे. परंतु त्याने स्वतःला वेगळे केले, आणि त्याला पकडले आणि त्याला परत मागे आणले.

आणि त्याच्या परतीच्या मार्गावर, युद्ध संपल्यानंतर.... उत्पत्ती १४ मध्ये जाऊया, फक्त एका मिनिटाकरिता, पहा जर गोष्ट ... अधिक स्पष्ट होईल. येथे उत्पत्तीमध्ये जाऊया, चार ... मी विश्वास करतो तो चौदावा आहे. उत्पत्ती १४. होय, उत्पत्ती १४:१८ घेऊया. सुरु ... त्याहून थोडेसे अगोदर सुरु करुया. सुरु करुया, होय, अठरावे पद. उत्पत्ती १४:१८, "आणि मलकीसदेक...." आता, तो अब्राहाम आता राजांना ठार

करुन परतत आहे. परत येतो, परतीच्या मार्गावर आहे, लोटाला परत आणीत आहे, सर्व लोकांना ज्यांना त्यांनी धरुन नेले होते.

29 सर्व.

दाविदासारखे, जो गेला आणि मिळविले.... दाविदाने काय केले? लहानशी गोफण घेतली, बाहेर गेला आणि सिंहाच्या मुखातून लहानशा मेंढराला पकडले. गोफणीचा विचार करा, मेंढरापाठी जात आहे. जगामध्ये कोण ते करील? मला सांगा कोणता मनुष्य येथे ते करील, तुमचा हात वर करा. मी तुम्हाला लगेचच सांगेन तुम्ही चुकीचे आहात. तुम्ही मला देखील माझा हात वर केलेला पाहिला नाही. नाही, मी त्याच्यापाठी ३०.०६ घेऊन ही, महत्प्रयासाने जाऊ शकलो नसतो. परंतु तो त्याच्यापाठी त्याच्या गोफणीने गेला - लहानसा चामड्याचा तुकडा, जसा, दोन त्यावर दोऱ्या - भोवती गुंडाळलेल्या. कारण....

आणि जेव्हा गल्ल्याथाचा फुशारकी मारण्याचा समय आला, तो गल्ल्याथाच्या पाठी गेला, आणि तो म्हणाला, "स्वर्गाच्या देवाने मला सिंहाच्या मुखातून, अस्वलाच्या मुखातून कोकऱ्याची सुटका करु दिली." त्याला ठाऊक होते ती गोफण नव्हती; ते देवाचे सामर्थ्य होते जे तिच्यासोबत गेले. तो एक होता ज्याने ते मेंढरु परत आणले.

30 आणि तेच काय ते आपण आज म्हणतो. देवाकडे सभोवती चिकटलेले दावीद आहेत, होय, महाशय, जे पित्याच्या मेंढरांना खाऊ घालतात. आणि कधी एकदा गळू येईल, किंवा कर्करोग येईल, किंवा काहीतरी, आणि वैद्याच्या हातातून निसटून जाईल. ते त्या दाविदाला थांबविणार नाही. तो सरळ त्याच्यापाठी त्या लहानशा गोफणीबरोबर जाईल: "माझ्या नावात काहीही मागा, ते दिले जाईल." मी पर्वा करीत नाही, वैद्य हसू शकतात, आणि इतर सर्वजण त्याची थट्टा करु शकतात, तो कसेहीकरुन त्याच्यापाठी जाईल, त्या मेंढराला कळपात परत आणील. होय, महाशय. "ते देवाचे लेकरु आहे, त्याच्यावरुन तुझा हात काढ!" या सिंहाला खाली पाडले. मग सिंह उठला, आणि त्याने त्याच्या दाढीला धरले आणि त्याला ठार केले. एक लहानसा तांबूस वर्णाचा मुलगा, कदाचित ऐंशी किंवा नव्वद पाऊंड वजनाचा.

31 आता पहा. मलकीसदेक, शालेमचा राजा, जो शांतीचा राजा आहे - जो, प्रत्यक्षात, शालेम टेकडीच्या पलीकडे वसलेले आहे. तो यरुशलेमेचा राजा आहे, जो तो होता. तोच काय तो तंतोतंत, यरुशलेमेचा राजा होता. जे, यरुशलेमेला प्रारंभी शालेम म्हटले जाई, जे "शांती" होते. ते प्रारंभी यरुशलेम होते, त्याला यरुशलेम म्हणण्याअगोदर. तो यरुशलेमेचा राजा होता. तो नीतिमत्वाचा राजा होता, शांतीचा राजा, शालेमचा राजा. त्याला पिता नव्हता, त्याला माता नव्हती, त्याच्या दिवसाचा प्रारंभ नव्हता, त्याच्या जीवनाचा शेवट नव्हता, त्याचा वंश नव्हता. हा मनुष्य कोण आहे? त्याचे निरीक्षण करा. युद्ध संपल्यानंतर, विजय मिळाल्यानंतर, तो काय म्हणाला पहा. "आणि मलकीसदेक..." अठरावे पद, चौदावा अध्याय, उत्पत्ती:

आणि शालेमचा राजा मलकीसदेक भाकर व द्राक्षारस घेऊन त्यास सामोरा आला: हा परात्पर देवाचा याजक होता.

त्याने त्याला येणे प्रमाणे आशीर्वाद दिला, आकाशाचा व पृथ्वीचा स्वामी, जो परात्पर देव तो अब्राहामाला आशीर्वाद देवो:

ज्या परात्पर देवाने, तुझे शत्रू तुझ्या स्वाधीन केले, तो धन्य. तेव्हा अब्राहामाने त्याला अवघ्याचा दहावा भाग दिला.

थोडेसे पुढे वाचूया:

मग सदोमाचा राजा अब्राहामास म्हणाला, माणसे मला द्या, आणि मालमत्ता तुम्ही ठेवा.

पण अब्राहाम सदोमाच्या राजाला म्हणाला, परमेश्वर, परात्पर देव, आकाशाचा व पृथ्वीचा स्वामी, याज समोर मी बाहू उभारुन सांगतो की [ऐका त्याने त्याचा कसा संक्षेप केला, हमम, कसे त्याने ते त्याला दिले!]

तुमचा एक सुतळीचा तोडा किंवा वहाणेचा बंध, ... मी घेणार नाही ..., मी अब्राहामास संपन्न केले, असे म्हणावयास, तुम्हास कारण न मिळो:

ह्या तरुण माणसांनी अन्न खाल्ले तेवढे पुरे....

32 या मलकीसदेकाकडे पहा लागलीच तो अब्राहामाला भेटला जेव्हा तो राजांना ठार करुन येत होता. देवाचे रहस्य आता कळविण्यात येत आहे - तो कोण होता? कोणीही ... ते त्याचा काही इतिहास शोधू शकले नाहीत, कारण त्याला कोणी पिता नव्हता, कोणी माता नव्हती, त्याच्या प्रारंभाचा कोणता समय नव्हता. त्याचा कोणता समय नव्हता की तो कधी मरेल, तेव्हा तो जो कोणी असेल तो आता ही जिवंत आहे. त्याचा कधी प्रारंभ नव्हता, तेव्हा तो कोणी नाही परंतु एल, एला, इलोहीम - स्वयंभू, स्वतः अस्तित्व, परात्पर देव असायला हवा!

येशूला पिता होता, येशूला माता होती. येशूच्या दिवसाचा प्रारंभ होता, येशूच्या पृथ्वीवरील जीवनाचा शेवट होता. परंतु ह्या मनुष्याला पिता नव्हता, माता नव्हती, आमेन, पिता नाही माता नाही. येशूला दोन्ही पिता आणि माता होते. या माणसाला पिता ही नव्हता माता देखील नव्हती. आमेन. आणि त्याने काय केले, युद्ध संपल्यानंतर, अब्राहामाने त्याचे पद घेतल्यानंतर?

मंडळीने तिचे पद घेतल्यानंतर, पवित्र आत्म्याद्वारे पुत्राच्या दत्तकपणासाठी आपल्याला पाचारण केले जाते. आणि जेव्हा प्रत्येक मनुष्याने त्याचे स्थान घेतल्यानंतर (देवाने जे काही करण्यासाठी त्याला पाचारले आहे), आणि मार्गाच्या शेवटावर उभा राहतो, नाशात गेलेल्यांच्या पाठी जातो....

33 प्रथम, पौल त्यातील सर्व भीती घालवून देतो, म्हणतो, "आता, जर तुम्हाला पाचारण केले आहे - जर तुम्ही तुमच्या मनामध्ये अगदी

कोणत्या प्रकारच्या धर्मशास्त्राद्वारे उत्तेजित झालेले नसाल - जर तुम्ही वास्तविकपणे आत्म्याद्वारे जन्म पावलेले असाल, मग देवाने तुम्हाला पृथ्वीच्या स्थापने अगोदर पूर्वनिर्धारित केले आहे, तुमचे नाव कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात टाकले आहे, आणि आता आपण एकत्र ख्रिस्त येशूमध्ये स्वर्गीय स्थानात बसण्यासाठी आलेलो आहोत. पवित्र लोक, पवित्र राष्ट्र, असाधारण लोक, राजकीय याजकगण, देवाला आत्मिक बलिदान अर्पण करीत आहोत, ते म्हणजे, आपल्या ओठांची फळे त्याच्या नावाला स्तुती देत आहेत."

लोक आत येतात आणि म्हणतात, "ते लोक वेडे आहेत." निश्चित ते आहेत. देवाचे शहाणपण माणसासाठी मूर्खपणा आहे, आणि माणसाचे शहाणपण देवासाठी मूर्खपणा आहे. ते एकमेकांच्या, विरुद्ध आहेत.

34 परंतु खरी आत्म्याने भरलेली मंडळी, देवाच्या सामर्थ्याने परिपूर्ण, स्वर्गीय स्थानात एकत्र बसलेली असून, आत्मिक बलिदान अर्पण करीत आहे, देवाची स्तुती करीत आहे, त्यांच्यामध्ये पवित्र आत्मा हालचाल करीत आहे, पापांची पारख करीत आहे आणि त्यांच्यामध्ये ज्या काही चुकीच्या गोष्टी आहेत त्या बाहेर काढीत आहे, सरळ करीत आहे आणि जागा सरळ बनवीत आहे.... कारण का? नेहमी देवाच्या उपस्थितीत ते रक्ताळलेले बलिदान आहे.

आता लक्षात ठेवा (आपण या सकाळी यामधून गेलो आहोत), तुम्ही रक्ताद्वारे वाचलेले नव्हते; तुम्ही रक्ताद्वारे वाचलेले राखले गेले होते. परंतु तुम्ही कृपेद्वारे विश्वासाने वाचलेले होते, ते विश्वास करण्याने. देवाने तुमच्या हृदयावर ठोकले कारण त्याने तुम्हाला पूर्वनिर्धारित केले. तुम्ही वर पाहिले आणि त्यावर विश्वास केला, ते स्वीकारले. आता रक्त तुमच्या पापांसाठी प्रायश्चित करते. लक्षात ठेवा, मी म्हणालो देव पाप्याला पाप करण्याकरिता दोषी ठरवीत नाही. तो सुरुवातीपासूनच पापी आहे. तो ख्रिस्तीजनाला पाप करण्याकरिता दोषी ठरवितो. आणि मग, कारण की त्याने त्याला दोषी ठरविले आहे, ख्रिस्ताने आपला दोष घेतला. तेव्हा "तेथे दोष नाही त्यांना जे ख्रिस्त येशूमध्ये आहेत जे देहानुसार चालत नाही, पण आत्म्याने चालतात."

आणि जर तुम्ही काही चुकीचे करता, ते स्वेच्छेने नाही. तुम्ही स्वेच्छेने पाप करीत नाही. मनुष्य जो स्वेच्छेने पाप करतो, बाहेर जातो आणि स्वेच्छेने पाप करतो, तो अजून ही कधीच त्या देहामध्ये आलेला नाही. परंतु मनुष्य जो एकदा तेथे येतो, तो मृत असतो, आणि त्याचे जीवन देवामध्ये गुप्त असते, ख्रिस्ताद्वारे, पवित्र आत्म्याद्वारे मुद्रित केले जाते; आणि सैतान त्याला शोधू ही शकत नाही, तो तेथे खूप मागे असतो. सैतानाला कधी त्याला घ्यायचे असेल तर त्याला बाहेर यावे लागेल.

कारण तुम्ही मृत आहात.

35 मेलेल्या माणसाला तो ढोंगी आहे सांगा आणि पहा काय घडते. त्याला एका बाजूला लाथ मारा आणि म्हणा, "तू म्हातारा ढोंगी, तू." तो एक शब्द देखील बोलणार नाही. ते बरोबर आहे, तो अगदी तेथे पडून राहील. आणि मनुष्य जो ख्रिस्तामध्ये मृत आहे, तुम्ही त्याला "ढोंगी" म्हणू शकता, तुम्हाला जे काही म्हणायचे असेल ते म्हणा, तो त्याकरिता कधीच उठणार नाही. जर काही करील, तो कुठेतरी जाईल आणि तुमच्यासाठी प्रार्थना करील. ते बरोबर आहे.

परंतु, ओह, त्यांच्यातील काही खूपच जिवंत आहेत. तेच काय ते मी ... बद्दल विचार करतो, आपण मृत लोकांना दफन करावयास हवे. ते जे ख्रिस्तामध्ये मृत आहेत, आपण त्यांना पाण्यामध्ये दफन करतो. काही वेळेस आपण कित्येक लोक जे जिवंत आहेत, खूप द्वेष आणि कलह आहे, त्यांना दफन करतो. आणि मंडळीमध्ये ते फार आहे, परंतु आपण ते वेगळे करु शकत नाही. परंतु देव करतो. त्याला त्याचे लोक ठाऊक आहेत. त्याला त्याची मेंढरे ठाऊक आहेत. त्याला प्रत्येक वाणी ठाऊक आहे. त्याला त्याची लेकरे ठाऊक आहेत. त्याला ठाऊक आहे तो कोणाला पाचारण करु शकतो, त्याला ठाऊक आहे त्याने कोणाला पूर्वनिर्धारित केले आहे. त्याला ठाऊक आहे त्याने कोणाला ह्या गोष्टी दिल्या आहेत, ज्या तो त्याद्वारे कळवीत आहे. कसे....

देव, काय करावे, याकरिता त्याच्या मुलांविषयी आत्मविश्वास ठेवू शकतो, माहिती आहे की ते तंतोतंत तसेच करतील. तुम्ही विश्वास करता देव तसे करतो?

36 का, एक दिवस सैतान ईयोबाला म्हणाला ... देवाला म्हणाला एक दिवस, "होय, तुझा एक दास आहे."

देव म्हणाला, "पृथ्वीवर त्याच्या समान कोणी नाही. तो परिपूर्ण मनुष्य आहे." त्याच्यामध्ये आत्मविश्वास होता.

सैतान म्हणाला, "ओह, होय, त्याला सर्वकाही सहज मिळाले आहे. थोड्या वेळाकरिता त्याला माझ्या हाती दे. मी त्याला तुझ्या तोंडावर तुला शाप द्यावयास लावीन."

तो म्हणाला, "तो तुझ्या हाती आहे, परंतु तू त्याचे जीवन घेऊ नको," पहा. आणि त्याने जीवनाव्यतिरिक्त सर्वकाही केले.

परंतु, वृद्ध ईयोब, ऐवजी.... त्याने काय केले? जेव्हा देवाने त्याची लेकरे घेतली, जेव्हा त्याने या सर्व वाईट गोष्टी त्याला केल्या, आणि सर्वकाही, त्याने देवाला शाप दिला का? ईयोबाने प्रश्न केला नाही. तो उपडा पडला आणि देवाची उपासना केली. हालेलूया! म्हणाला, "परमेश्वराने दिले, परमेश्वराने नेले, धन्य परमेश्वराचे नाव!" तेथे तुम्ही आहात.

देवाला ईयोबामधील त्याची निष्ठा माहित होती. देवाला ठाऊक आहे तो तुमच्यावर किती भरवसा करु शकतो. त्याला ठाऊक आहे तो माझ्यावर किती भरवसा करु शकतो.

परंतु आता आपण काय बोलत आहोत ते या मुलाला स्थानापन्न करणे.

37 आता, पवित्रशास्त्रात जेव्हा सर्व युद्ध संपेल, जेव्हा सर्वकाही संपेल, मग पुढची गोष्ट काय आहे जी आपण करु? काय गोष्ट आहे जी आपण करु युद्ध संपल्यानंतर? तुम्हाला ठाऊक आहे आपण काय करु? आपण मलकीसदेकेला भेटू. मत्तय १६:१६ काढूया, अगदी लगेचच, पहा जर ते बरोबर आहे किंवा नाही. मत्तय सोळावा अध्याय आणि सोळावे पद. मत्तय सहा.... नाही, ते चुकीचे आहे, ते एवढे निकट असू शकत नाही. २६:२६. बरे, सोळावे येथे, तो शिमोन पेत्राशी बोलत आहे. मला माफ करा, मला तसे म्हणायचे नव्हते. २६:२६, कारण अगदी ... शेवटले भोजन, तेच आहे जे मी घेण्याचा प्रयत्न करीत आहे. मत्तय, सव्वीसावा अध्याय आणि सव्वीसावे पद. आता आपल्याला ते मिळाले. आपण येथे आहोत, शेवटच्या भोजनावर.

मग ते भोजन करीत असताना, येशूने भाकरी घेतली, आशीर्वाद देऊन, ती मोडली, आणि शिष्यास देऊन, म्हटले, घ्या, खा; हे माझे शरीर आहे.

आणि त्याने प्याला घेतला, व उपकारस्तुती करुन, तो त्यास दिला, व म्हटले, तुम्ही सर्व यातून प्या;

हे माझे नव्या कराराचे रक्त आहे, हे पापांची क्षमा होण्यासाठी पुष्कळांकरिता ओतले जात आहे [पा-प, पाप - ख्रिस्तीजन जे गोष्टी चुकीच्या करतात.]

ठीक आहे. परंतु ऐका, एकोणतिसावे पद.

...मी तुम्हास सांगतो, की मी आपल्या पित्याच्या राज्यात तुम्हाबरोबर नवा द्राक्षारस पिईपर्यंत, येथून पुढे द्राक्षाचा हा उपज पिणारच नाही.

काय? हीच गोष्ट मलकीसदेकने केली अब्राहामाला त्याचे पद मिळाल्यानंतर. त्याच्या माणसांना योग्य स्थानात ठेवले, आणि युद्ध जिंकले, आणि तो घरी आला, आणि मलकीसदेक भाकर व द्राक्षारस घेऊन बाहेर आला. युद्ध संपल्यानंतर, मग आपण प्रभू येशूबरोबर नव्या जगात विवाह भोजन खाणार आहोत. ओह, परमेश्वराचे नाव धन्यवादित असो.

ठीक आहे.

38 ...त्याच्या स्वसंकल्पाचे रहस्य, त्याच्या स्वतःच्या इच्छेनुरुप [आता परत मागे इफिसकरांस ९ मध्ये], ख्रिस्ताच्या ठायी पूर्वी केलेल्या योजनेप्रमाणे.

ती योजना अशी की कालखंडाच्या पूर्णतेची व्यवस्था लावताना....

आणि ते लक्षात ठेवा, आपण अगदी त्याला वगळले. इफिसकरांस, पहिला अध्याय, दहावे पद.

की कालखंडाच्या पूर्णतेची व्यवस्था लावताना....

आता, आपण शिकलो की कालखंडाची पूर्णता कशाची वाट पाहत आहे? सर्व समयाच्या पूर्णतेची, समय जेव्हा पापाचा अंत होईल, समय जेव्हा मृत्यूचा अंत होईल, समय जेव्हा आजाराचा अंत होईल, समय जेव्हा पापाचा अंत होईल, समय जेव्हा सर्व विकृती आणि विकृत गोष्टी, ज्या सैतानाने विकृत केल्या आहेत, त्याचा अंत होईल - जेव्हा स्वतः समयाचा देखील अंत होईल. पहा.

की कालखंडाच्या पूर्णतेची व्यवस्था लावताना ... स्वर्गात, व पृथ्वीवर जे आहे, ते सर्व ख्रिस्तामध्ये, एकत्र करावे; अगदी त्याच्यामध्ये देखील;

"ख्रिस्ताद्वारे सर्व गोष्टी एकत्र कराव्या." जसे मी या सकाळी म्हणालो, सर्व लहान मणी जे आपल्याला आढळतात, या सर्व महान लहान गोष्टी, तुम्ही त्यांना उत्पत्तीमध्ये उजळवू शकता, तुम्ही त्यांना निर्गमनामध्ये उजळवू शकता, तुम्ही त्यांना लेवीय मध्ये उजळवू शकता, आणि त्यांना त्यातून आणा, आणि प्रकटीकरणात त्या येशूमध्ये पूर्णत्वास जातील. तुम्ही योसेफाला घ्या, तुम्ही अब्राहामाला घ्या, तुम्ही इसहाकाला घ्या, तुम्ही याकोबाला घ्या, तुम्ही दाविदाला घ्या - आणि पहा जर तुम्ही त्या प्रत्येकामध्ये येशू ख्रिस्ताला प्रदर्शित होताना पाहत नाहीत. "की तो सर्व गोष्टी एकामध्ये, ख्रिस्त येशूमध्ये एकत्र करील."

39 आता, थोडेसे पुढे आता. आता ते अकरावे पद:

त्याच्यामध्ये आपल्याला वतन मिळाले आहे....

ओह, वतन. कोणीतरी तुमच्यासाठी काहीतरी सोडून जायला हवे ते वतन मिळण्यासाठी. ते बरोबर आहे? वतन - आपल्याकडे काय वतन आहे? माझ्याकडे काय वतन होते? माझ्याकडे काहीही नव्हते. परंतु देवाने माझ्यासाठी वतन ठेवले, जेव्हा त्याने माझे नाव कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात जगाच्या स्थापनेपूर्वी टाकले.

ओह, तुम्ही म्हणता, "आता, एक मिनिट थांबा, भावा. येशूने ते केले जेव्हा तो तुझ्यासाठी मेला." नाही, त्याने कधीही केले नाही. ते वतन माझ्यासाठी विकत घेण्यास येशू आला. अगदी पुढची ओळ वाचा:

आपल्याला मनाच्या संकल्पाप्रमाणे जो अवघे चालवितो त्याच्या योजनेप्रमाणे आम्ही पूर्वनिर्धारित असून, ख्रिस्ताच्या ठायी वतनदार झालो आहोत:

40 देव, जगाच्या स्थापनेअगोदर, जसे आपण धड्यामधून घेतले, तुम्ही लोकांनी.... कसे आपण पाहिले देव स्वअस्तित्व असा होता: कसे त्याच्यामध्ये प्रेम होते, त्याच्यामध्ये देव व्हावे असे होते (त्याची उपासना करण्यासाठी तेथे काही नव्हते); त्याच्यामध्ये पिता व्हावे असे होते (तो केवळ स्वतः एकटा होता); त्याच्यामध्ये तारक व्हावा असे होते (काहीही नाशात गेले नव्हते); त्याच्यामध्ये आरोग्यदाता व्हावा असे होते.... ते त्याचे गुण आहेत. तेथे काहीही नव्हते, तेव्हा केवळ तो स्वतः होता, त्याच्या स्वतःच्या चांगल्या संकल्पाने या गोष्टी निर्माण केल्या, की तो या एक माणूस, ख्रिस्त येशूद्वारे, सर्वकाही परत एकत्र करील. ओह, डोळ्याने पाहिले नाही, कानाने.... आश्चर्य नाही की ही रहस्यमय गोष्ट आहे.

41 पहा ... आपल्याला या वतनात पूर्वनिर्धारित केले आहे. जर मला कोणत्यातरी वतनाचा अधिकार आहे, जर देव माझ्या हृदयावर ठोठावतो आणि म्हणत आहे, "विल्यम ब्रॅन्हम, मी तुला खूप पूर्वी पाचारण केले आहे, जगाच्या स्थापनेपूर्वी, सुवार्ता प्रचार करण्यासाठी," माझ्याकडे वतन आहे - अनंत जीवनाचे वतन. आता, देवाने ते वतन माझ्यासाठी वास्तविक करण्यास येशूला पाठविले, कारण तेथे काही नव्हते ते वतन मिळविण्यासाठी जे मी करु शकत होतो. ते रिक्त होते. ते वैध होते. तेथे काही नव्हते जे मी करु शकत होतो. परंतु समयाची पूर्तता होताच देवाने पाठविले - त्याच्या स्वतःच्या योग्य वेळी - येशू कोकरा, जगाच्या स्थापनेपासून वधला होता. त्याचे रक्त सांडले गेले की मी माझ्या वतनात जावे. कशासाठी? काय वतन? पुत्रत्व, देवाचा पुत्र होण्याकरिता.

42 आणि आता हे कदाचित तुम्हाला अगदी मरणापर्यंत गुदमरवेल, परंतु तुम्हाला माहिती आहे का मनुष्ये जी देवाची पुत्र आहेत ते अपरिपक्व देव आहेत? किती जणांना ते कधी ठाऊक होते? किती जणांना ठाऊक आहे येशू असे म्हणाला? पवित्रशास्त्र, येशू, म्हणाला, "तुमचे नियमशास्त्र स्वतः म्हणत नाही का तुम्ही देव आहात? आणि जर तुम्ही त्यांना देव म्हणता...?" जे, देव उत्पत्ती २ मध्ये म्हणतो की ते देव होते, कारण त्यांची जगाच्या अधिकार क्षेत्रावर संपूर्ण सत्ता होती. त्याने त्यांना सर्व गोष्टीवर सत्ता दिली होती. आणि त्याने त्याचे देवत्व गमावले, त्याने त्याचे पुत्रत्व गमावले, त्याने त्याची सत्ता गमावली, आणि सैतानाने त्याचा कब्जा केला.

परंतु, भावा, आपण देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याची वाट पाहत आहोत जो परत येईल आणि परत एकदा कब्जा करील. समयाच्या पूर्ततेची वाट पाहत आहोत, जेव्हा पिरॅमिड शिखरापर्यंत जाईल, जेव्हा देवाचे पुत्र पूर्णतेत प्रकट होतील, जेव्हा देवाचे सामर्थ्य बाहेर चालेल (हालेलूया!) आणि सैतानाचे प्रत्येक सामर्थ्य जे त्याच्याकडे आहे, त्याच्याकडून काढून घेईल. होय, महाशय, ते त्याच्या मालकीचे आहे.

43 तो लोगॉस आहे जो देवामधून बाहेर गेला. ते खरे आहे. तो देवाचा पुत्र होता. मग त्याने माणसाला लहान देव बनविले. आणि तो म्हणाला, "जर ते त्यांना ज्यांच्याकडे देवाचे वचन येते (संदेष्टे), जर ते त्यांना देव म्हणतात ज्यांच्याकडे देवाचे वचन येते...." आणि देव तसेच म्हणाला, स्वतः, की ते देव होते. तो मोशेला म्हणाला, "मी तुला देव बनविले आहे, आणि अहरोनाला तुझा संदेष्टा बनविले आहे." आमेन. व्हू! मी धार्मिक वेड्यासारखे वर्तन करु शकतो, परंतु मी तसा नाही. ओह, जेव्हा तुमचे डोळे उघडू शकतील आणि त्या गोष्टी पाहतील! ठीक आहे.

त्याने माणसाला देव बनविले, त्याच्या सत्तेमध्ये देव. आणि त्याची सत्ता समुद्रापासून ते समुद्रापर्यंत होती, किनाऱ्यापासून ते किनाऱ्यापर्यंत. त्याच्यावर त्याचा ताबा होता. आणि जेव्हा येशू आला, एक देव म्हणून, पापाशिवाय, त्याने ते सिद्ध केले. जेव्हा वारा सुटला, तो म्हणाला, "उगा रहा, शांत हो!" आमेन. आणि जेव्हा झाड ... तो म्हणाला, "कोणत्या मनुष्याने तुझ्यामधून खाऊ नये...."

खचित, मी तुम्हाला सांगतो [तुम्ही जे लहान देव आहात], जर तुम्ही ह्या डोंगराला 'सरकला जा' म्हणाल, आणि तुमच्या हृदयात शंका बाळगणार नाही, परंतु आपण म्हणतो तसे घडेलच असा विश्वास धरील, त्याच्या शब्दाप्रमाणे घडून येईल.

44 सरळ मागे उत्पत्तीत, मुळाकडे परत जा.

ते काय आहे? आता जग आणि सृष्टी कण्हत आहे, ओरडत आहे, सर्वकाही हालचाल करीत आहे. कशासाठी? देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याची, जेव्हा खरे पुत्र, जन्मलेले पुत्र, भरलेले पुत्र, बोलतील आणि त्यांच्या शब्दाला पाठिंबा दिला जाईल. मी विश्वास करतो आताच आपण त्याच्या सीमेवर आहोत. होय, महाशय. "या डोंगराला म्हणा, तसेच होऊ दे."

"भावा, मी अमुक आणि अमुकाची इच्छा धरतो, अमुक एक गोष्ट होवो. मी येशू ख्रिस्तामध्ये एक विश्वासू आहे."

"मी प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावात तुला ती देतो." आमेन. तेथे प्रकटीकरण आहे.

"ओह, भावा, माझे पीक तेथे पलीकडे करपत आहे. माझ्याकडे अजिबात पाऊस नाही."

"मी प्रभू येशूच्या नावात तुझ्याकडे पाऊस पाठवितो. होय, महाशय." ओह, थांबलेला आहे, कण्हत आहे, देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याची वाट पाहत सर्व सृष्टी थांबलेली आहे! देवाने ते प्रारंभीच नियुक्त केले आहे. त्याने माणसाला सत्ता दिली.

45 त्याने येशू ख्रिस्त दिला, आणि येशूने त्याचे [अस्पष्ट शब्द] नाव, या आश्वासनाने दिले, "माझ्या नावात पित्याकडे काहीही मागा आणि मी ते करीन." ओह, भाऊ पाल्मर! देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याची वाट पाहत आहे - ते पद, ती मंडळी.

जसे मी म्हणालो, इफिसकरांस पुस्तक हे यहोशवाचे पुस्तक आहे, यहोशवा लोकांना तेथे स्थानापन्न करीत आहे जेथे त्यांची मालकी आहे. आता, जर ते स्तब्ध उभे राहिले नाही; आणि त्याने एफ्राईमाला येथे ठेवले आणि ते मनश्शेच्या भूमीमध्ये धावले; आणि हा परत आला आणि गडबड आणि कलह करु लागला; कसे काय ते एकत्र राहणार आहेत? जेव्हा एक म्हणतो, "मी बॅप्टिस्ट आहे, मी मेथडिस्ट आहे, मी पेन्टिकॉस्टल आहे, मी एकत्ववादी आहे, मी द्विवादी आहे, मी अमुक आणि अमुक आहे," तुम्ही कसे काय ते करणार आहात? स्तब्ध रहा! देव त्याच्या मंडळीला देवाचे पुत्र आणि कन्या असे स्थानापन्न करणार आहे.

देवा, ते पाहण्यासाठी मला जिवंत ठेव ही माझी प्रार्थना आहे. इतके निकट की मला अगदी ते जाणवत आहे माझे हात जवळजवळ - अगदी सरळ तेथे. तेच काय ते पाहण्यासाठी मी उत्कंठित आहे. त्या समयाची वाट पाहत आहे जेव्हा आपण रस्त्यावरुन चालू, तेथे आईच्या गर्भाशियापासून, लंगडा असलेला पडलेला असेल, "सोने आणि रुपे माझ्याकडे काही नाही...." ओह, देवाच्या पुत्राच्या प्रकट होण्याची वाट पाहत आहोत, हालेलूया, जेव्हा देव स्वतःला ज्ञात करुन देईल - जेव्हा ते आजार थांबवतील, ते कर्करोग थांबवतील, ते रोग थांबवतील.

46 तुम्ही कर्करोग काहीतरी आहे विचार करता? पवित्र शास्त्र म्हणते असा समय येत आहे जेव्हा माणसे सरळ त्यांच्या देहामध्ये सडतील, आणि ते अगदी मरण्यापूर्वी गिधाडे त्यांच्या मांसामधून खातील. जे काही येत आहे त्यासमोर कर्करोग दातदुखी सारखा आहे. परंतु लक्षात ठेवा, त्या भयंकर गोष्टीला त्या दिवसात ज्यांच्यावर देवाचा शिक्का आहे त्यांना स्पर्श करण्याची मनाई केली गेली होती. त्याच करिता आपण आता संघर्ष करीत आहोत, की आत यावे आणि देवाच्या राज्यात योग्य पदावर स्थानापन्न व्हावे त्या भयंकर मरीचा प्रहार होण्यापूर्वी. ओह, किती चांगले! कालखंडाची पूर्णता, समयाची पूर्तता, वतन....

आपल्याला त्याच्यामध्ये ... वतन मिळाले आहे, पूर्वनिर्धारित केल्याने...

47 आपले वतन आपल्याला कसे देण्यात आले, कशा द्वारे? पूर्वनिर्धारितपणाद्वारे. पूर्वनिर्धारितपणा हे "पूर्वज्ञान" आहे. देवाला कसे ठाऊक तो तुमच्यावर प्रचारक म्हणून भरवसा करु शकतो? त्याचे पूर्वज्ञान. "इच्छा करणाऱ्यावर नाही, किंवा तो जो धावतो, किंवा तो.... तो देव आहे जो दया करतो." ते बरोबर आहे, पूर्वनिर्धारितपणा. त्याला ठाऊक होते तुमच्यामध्ये काय होते. तुम्ही अगदी या पृथ्वीवर येण्याअगोदर त्याला ठाऊक होते तुमच्यामध्ये काय होते. तेथे तुमच्यासाठी येण्यास कधी पृथ्वी असण्याअगोदर त्याला ठाऊक होते तुमच्यामध्ये काय होते. तो तो आहे, तो अमर्याद देव आहे. अमर्याद. आपण मर्यादित आहोत, आपण केवळ मर्यादित विचार करु शकतो.

48 तेव्हा पासून माझ्यासाठी हे खूपच आहे.... मला काय झाले मला ठाऊक नाही. जेव्हा मी तेथे विचार करतो ... जेव्हा मी तेथे त्या काही आनंददायी क्षणांसाठी उभा राहिलो, आणि विचार केला, "तेथे उद्या नाही, तेथे काल नाही, तेथे आजार नाही, तेथे दुःख नाही. तेथे थोडासा आनंद नाही; मग खूप मोठा आनंद आहे. तो सर्व आनंदच आहे." ओह, माझ्या! ओह, जेव्हा मी तेथे उभा राहिलो, आणि मी म्हणालो, "हे काय आहे?"

ती वाणी म्हणाली, "हे सिद्ध प्रेम आहे, आणि ते सर्व ज्याला कधी तू प्रेम केले आणि ते सर्वकाही ज्याने कधी तुला प्रेम केले ते आता तेथे तुझ्याबरोबर आहे."

"आणि जेव्हा प्रभू येशू येईल तेव्हा, तुझ्या सेवेचे पारितोषिक म्हणून, तू आम्हाला त्याला सादर करशील." मी त्या सुंदर स्त्रियांना तेथे उभे राहिलेले पाहिले, सर्व मला पकडीत होते आणि ओरडत होते, "माझ्या मूल्यवान प्रिय भावा!" त्या मनुष्यांना पाहिले, त्यांच्या मानेभोवती त्या दाट केसांमध्ये, धावताना, मला पकडत आणि म्हणत होते, "आमच्या प्रिय भावा!"

आणि मी विचार केला, "याचा अर्थ काय?"

तो म्हणाला, "ते तुझे लोक आहेत."

मी म्हणालो, "माझे लोक? तेथे तेवढे ब्रॅन्हम असू शकत नव्हते. तेथे दशलक्ष होते."

तो म्हणाला, "ते तुझ्याद्वारे परिवर्तन झालेले आहेत! [हालेलूया] ते तुझ्याद्वारे परिवर्तन झालेले आहेत. ते एक आहेत जे...." म्हणाला, "तू त्या स्त्रीला तेथे उभे राहिलेले पाहतोस [सर्वात सुंदर स्त्री जी कधी मी पाहिली असेल]?" म्हणाला, "तिने नव्वद वर्ष वय पार केले होते जेव्हा तू तिचे देवाकडे नेतृत्व केले. आश्चर्य नाही ती ओरडत आहे, 'माझ्या प्रिय भावा.'" म्हणाला, "ती कधीही वृद्ध होणार नाही. ती त्यातून पार गेलेली आहे. ती तारुण्याच्या सौंदर्यात आहे. ती येथे उभी आहे. ती थंड पाणी पिऊ शकत नाही; तिला त्याची गरज नाही. ती झोपण्यासाठी पहुडत नाही कारण ती थकत नाही. तेथे उद्या नाही, काल नाही, काहीही नाही - आता आपण अनंततेत आहोत. परंतु कधीतरी गौरवी दिवशी देवाचा पुत्र येईल, आणि त्यांना जे वचन तू प्रचार केले आहे त्यानुसार तुझा न्याय केला जाईल." ओह, भावा!

मी म्हणालो, "पौलाला त्याचा गट आणावा लागेल?"

"होय, महाशय."

मी म्हणालो, "जसे पौल म्हणाला अगदी तंतोतंत तसेच मी प्रचार केले. मी कधीही विभक्त झालो नाही, मी कधीही कोणत्या मंडळीचा पंथ किंवा काहीही घेतले नाही. मी तसाच राहिलो."

आणि ते सर्व एकमताने ओरडले, "आम्हाला ते ठाऊक आहे! आम्ही आश्वासनाने विसावा घेत आहोत." म्हणाला, "तू आम्हाला त्याला सादर करशील, आणि मग आपण सर्व परत पृथ्वीवर जाऊ, सर्वकाळ जगण्यासाठी." ओह, माझ्या!

49 अगदी तेव्हा मी येण्यास सुरुवात केली. मी तेथे बिछान्यावर झोपलेले पाहिले, आणि मी माझे वृद्ध शरीर येथे वृद्ध होत असलेले आणि सुरकुत्या पडलेले, आणि सुकलेले, आणि रोगाने भरलेले, आणि पीडित असे पाहिले - आणि मी माझे हात माझ्या डोक्यामागे पाहिले, आणि मी विचार केला, "ओह! मला परत त्या गोष्टीत मागे जावे लागेल का?"

मग मी त्या वाणीला ऐकत राहिलो, "पुढे जात रहा! पुढे जात रहा!"

मी म्हणालो, “प्रभू, मी नेहमीच दैवी आरोग्याचा विश्वास केला आहे. मी तो विश्वास करीत राहीन. परंतु मी त्या प्राणासाठी पुढे जात राहीन, तेव्हा मला साहाय्य कर. मला तेथे कित्येक असतील, मी.... मला जगू दे, प्रभू, आणि मी अजून दुसरे दशलक्ष तेथे टाकीन! - जर तू मला फक्त जगू देशील.”

50 मी पर्वा करीत नाही कोणता रंग, कोणता पंथ, कोणते राष्ट्रीयत्व, ते काय आहेत, ते सर्व एक आहेत जेव्हा ते तेथे येतील. त्या जुन्या सीमारेषा निघून गेल्या आहेत. ओह, मी त्या स्त्रियांना पाहू शकलो, किती सुंदर. कधी पाहिल्या नाहीत ... लांब, लांब केस त्यांच्या पाठीमागे खालपर्यंत, खालपर्यंत लांब स्कर्ट, त्या अनवाणी होत्या. त्या मनुष्यांना त्यांच्या मानेवर भरगच्च केसांनी, लाल केसांचे, काळ्या केसांचे, आणि सर्व विभिन्न रंगाचे असे पाहिले. आणि ते त्यांचे बाहू माझ्याभोवती टाकीत होते. मी त्यांचा स्पर्श अनुभवू शकत होतो. मी त्यांच्या हातांना अगदी जाणवू शकत होतो (देव माझा न्याय करणारा आहे, आणि हे पवित्र पुस्तक उघडे आहे) ... मी त्यांचा स्पर्श अनुभवू शकत होतो अगदी जसा मी माझ्या हाताचा तोंडावर स्पर्श जाणवतो.

ते अगदी त्यांचे हात माझ्याभोवती टाकीत होते - स्त्रियांची संवेदना नाही जशी आता ती आहे. मी पर्वा करीत नाही तुम्ही किती पवित्र आहात, तुम्ही कोण आहात, तुम्ही कोणत्या प्रकारचे प्रचारक आहात, याजक किंवा जे काही तुम्ही असाल, तेथे कोणता ही मनुष्य नाही जो स्त्रीला ... त्याचे हात तिच्या भोवती टाकील मानवी संवेदना असल्याशिवाय. ते तंतोतंत सत्य आहे. परंतु, भावा, जेव्हा तू येथून पार होतोस तेथे पलीकडे, तेथे अशा प्रकारे नाही. ओह, माझ्या! ते इतके, ओह, तेथे ... ते अशक्य आहे...! ते सर्व प्रेम आहे. सर्वकाही वास्तविक भाऊ आणि सर्वकाही वास्तविक बहीण आहे. तेथे मरण नाही, दुःख नाही, मत्सर नाही, काहीही नाही. तेथे काहीही प्रवेश करु शकत नाही. ते अगदी परिपूर्ण आहे.

त्यासाठीच मी काय तो संघर्ष करीत आहे. त्यासाठी काय ते मी स्थानापन्न करीत आहे.

51 मी म्हणालो, “हे परमेश्वरा....” त्या साठीच काय तो मी येथे मंडळीमध्ये आहे, मंडळीला योग्य क्रमात बसविण्याचा प्रयत्न करीत आहे, तुम्हाला सांगतो, भावा, बहिणी, तेथे केवळ एक गोष्ट आहे जी प्रवेश करु शकते, ते सिद्ध प्रेम आहे. यामुळे नाही की तुम्ही ब्रॅन्हम प्रार्थनामंदिराशी निष्ठावान आहात, किंवा मेथडिस्ट मंडळी, किंवा बॅप्टिस्ट मंडळीशी. ते ठीक आहे. तुम्ही असायला हवे. परंतु, ओह, मित्रांनो, तुमच्याकडे आहे.... यासाठी नाही की तुम्ही अन्य भाषेत बोललात, आत्म्यात नाचलात, कारण की तुम्ही विश्वासाने भुते घालविली किंवा डोंगर ढळविले. ते सर्व ठीक आहे, ते सर्व ठीक आहे, परंतु तरीही, जोपर्यंत ते वास्तविक सिद्ध प्रेम तेथे नाही.... तेथे जेथे सिद्ध [ध्वनिमुद्रणपट्टीवर रिक्त स्थान].

52 ...वतन मिळाले [आपल्याला काय वतन मिळाले? अनंत जीवन.], पूर्वनिर्धारित केल्याने....

कसे? सर्वांना ते समजले का? तुम्ही देवाला बोलाविले का? नाही, देवाने तुम्हाला बोलाविले. कोणत्याही मनुष्याने कधीही देवाला शोधले नाही; तो देव आहे जो मनुष्याला शोधतो. येशू म्हणाला, “पित्याने प्रथम आकर्षिल्या शिवाय कोणीही माझ्याकडे येऊ शकत नाही.” पहा, देवापासून पळण्याचा मनुष्याचा स्वभाव आहे. आणि आता तुम्ही म्हणता....

तेच काय ते मला चिंताक्रांत करते, जरी, तुम्हा लोकांना प्रचार करतो; त्याच स्थितीमध्ये राहू नका ज्यामधून तुम्ही जात आहात. आता बदला! जेव्हा मी हे म्हणतो मला ऐका, “परमेश्वर असे म्हणतो....” मी स्वतःला हे कधीही म्हटले नाही (मी नाही.), परंतु तुम्ही मला तुमचा संदेष्टा म्हणता, किंवा एक संदेष्टा म्हणता. जग हे विश्वास करते, जगभर, दशलक्ष आणि दशलक्ष आणि दशलक्ष लोक. मी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या दहा किंवा बारा दशलक्ष लोकांशी किंवा अधिकांशी बोललो आहे, प्रत्यक्ष बोलत आहे. मी लाखो दृष्टांत आणि चिन्हे व अद्भुत पाहिली आहेत, आणि त्यातील एक ही कधी अपयशी ठरले नाही. आणि ते बरोबर आहे. त्याने मला भाकीत केलेल्या गोष्टी कधीही अगदी तंतोतंत घटित व्हावयाच्या राहिल्या नाहीत. मी कोणत्याही माणसाला त्यासाठी साक्षी म्हणून आणीन. ते बरोबर आहे.

मी संदेष्टा असल्याचा दावा करीत नाही, परंतु तुम्ही माझे ऐका:

53 परमेश्वर असे म्हणतो, तुम्हाला त्या स्थानात ठेवण्यासाठी सिद्ध प्रेमाची गरज आहे, कारण तेच सर्वकाही तेथे होते. काही फरक पडत नाही कितीतरी कित्येक, किती धार्मिक प्रात्यक्षिके, किती चांगली कृत्ये तुम्ही केली आहेत, किंवा तुम्ही जे काही केले असेल, त्या दिवशी ते काहीही गणले जाणार नाही. ते केवळ सिद्ध प्रेम घेईल. तेव्हा जे काही तुम्ही करता, तुम्ही सर्वकाही बाजूला ठेवा जोपर्यंत तुम्ही अगदी देवाच्या प्रेमाने इतके भरत नाही की तुम्ही त्यांना प्रेम करु शकाल जे तुमचा द्वेष करतात.

मी फक्त ... जसे मी या सकाळी म्हणालो, मी असा बनलो ... माझी अखंड घडण ही कृपा आहे. खूप लोक म्हणतात, “आता, तू माझी पाठ खाजीव आणि मी तुझी खाजवीन. बरोबर. तू माझ्यासाठी काहीतरी कर आणि मी तुझ्यासाठी काहीतरी करीन.” ती कृपा नाही. कृपा ही आहे की जर तुमच्या पाठीला खाज येत आहे, कसेहीकरुन मी ती खाजवीन, तू माझी पाठ खाजवो की न खाजवो. तू मला तोंडावर मार, आणि म्हण, “माझ्या पाठीला खाजविण्याची गरज आहे ... खाजविण्याची गरज आहे,” मी ती खाजवीन. पहा, बस एवढेच. काहीतरी करा. मी कृत्यांमध्ये विश्वास करत नाही. मी विश्वास करतो की कृत्ये ही प्रेम आहे. कृत्ये ही प्रकटीकरण आहे की कृपेने कार्य केले आहे.

मी यासाठी माझ्या पत्नीशी सत्यतेने राहत नाही की मी विश्वास करतो ती मला घटस्फोट देईल जर मी राहिलो नाही. मी तिच्याशी सत्यतेने राहतो कारण मी तिला प्रेम करतो.

54 मी यासाठी सुवार्ता प्रचार करीत नाही कारण मला वाटते मी नरकात जाईन जर मी प्रचार केला नाही; मी यासाठी सुवार्ता प्रचार करतो

कारण मी त्याला प्रेम करतो. निश्चित. तुम्ही विचार करता मी ते वादळ युक्त समुद्र ओलांडले असते, आणि ती विमाने मागे पुढे डळमळत होती, आणि सभोवार वीज कडकडत होत्या, आणि सर्वकाही, आणि अगदी कोणत्याही मिनिटाला ... आणि सर्वजण किंचाळत होते, आणि "नमो, मरीया" विमानात होत होते, आणि सर्वकाही? ते लोक त्या सुरक्षित पट्ट्यात लोंबकळत होते, आणि वैमानिक म्हणाला, "पंधरा मिनिटे चालेल एवढे इंधन उरलेले आहे, माहित नाही आपण कुठे आहोत." - तुम्ही विचार करता मी ते केवळ एक मौज म्हणून करतो? हू!

तुम्ही विचार करता मी त्या जंगलामध्ये जेथे जर्मन सैनिकांनी त्यांची शस्त्रास्त्रे माझ्या सभोवती ठेवली होती, अशा प्रकारे, प्रत्येक रात्री आणि मला आत नेत आणि सभेबाहेर नेत, त्यातून मी आलो असतो (जोपर्यंत पवित्र आत्म्याने चमत्कार सादर करण्यास सुरुवात केली नाही), साम्यवादी रात्रीची दुर्बीण घेऊन, मला मैलावर ठार करण्यासाठी बसलेले होते - तुम्ही विचार करता ते केवळ मी मौज म्हणून केले असेल? कारण काहीतरी माझ्यामध्ये ... प्रेम. ती माणसे आहेत ज्यांच्यासाठी ख्रिस्त मेला. पौल म्हणाला, "मी केवळ यरुशलेमेस जाण्यासाठीच नाही, परंतु तेथे वधस्तंभावर खिळण्यास ही इच्छुक आहे. मी तेथे वर मरण्यासाठी जात आहे. प्रभूच्या कार्यासाठी मी तेथे वर मरावयास जात आहे." ते काहीतरी आहे - प्रेम - जे तुम्हाला भाग पडते, ते तुम्हाला बनविते. ते अगदी बरोबर आहे.

55 जर मी पैशासाठी सुवार्ता प्रचार केली असती, जर तसे असते, मी आज रात्री वीस हजार डॉलर कर्जात नसतो. मी तेवढा कर्जात नसतो. नाही, महाशय, कारण की मी काही दशलक्ष जे मला दिले गेले होते ते ठेवले असते. एका माणसाने, एका माणसाने, १,५००,००० डॉलरच्या पैशाच्या मसुद्याबरोबर एफ.बी.आय गुप्तहेराला पाठविले होते. आणि मी म्हणालो, "ते परत घेऊन जा." पैशासाठी नाही! तो पैसा नाही. मी पैशासाठी सुवार्ता प्रचार करीत नाही. ते त्यासाठी नाही; ते प्रेमाखातर आहे.

जी गोष्ट मला करायची आहे ती, जेव्हा मी पलीकडे जाण्यासाठी शेवटचा श्वास घेईन, जो कदाचित आतापासून पाच मिनिटात असेल.... आतापासून कदाचित तो दोन तासांनी असेल, तो कदाचित आतापासून पन्नास वर्षांनी असेल - मला ठाऊक नाही तो कधी असेल. परंतु जेव्हा तो असेल ... जेव्हा मी तेथे जाईन, मला तारुण्याचे वैभव धावताना, आरोळी मारताना, पाहायचे आहे, "माझ्या प्रिय भावा. माझ्या भावा!" तेच काय ते माझ्या हृदयात आहे. त्याच कारणास्तव. मी तुमच्याशी वेगळा असण्यासाठी असहमत होण्याचा प्रयत्न करीत नाही, परंतु मी तुम्हाला मार्गावर जो योग्य आहे तेथे ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे. तो आत जाण्याचा मार्ग आहे. तुमची मंडळी नाही, तुमचा संप्रदाय नाही, परंतु ख्रिस्तामधील तुमचा जन्म. ओह, माझ्या. हू!

56 ज्यामध्ये ... आपल्याला ... वतन मिळालेले आहे, आपल्याला मनाच्या संकल्पाप्रमाणे जो अवघे चालवितो त्याच्या योजनेप्रमाणे आम्ही पूर्वी पूर्वनिर्धारित आहोत:

ऐका. आपण काही मिनिटात समाप्त करणार आहोत. आता काळजीपूर्वक ऐका आपण समाप्त करण्यापूर्वी.

ह्यासाठी की ज्या आम्ही ख्रिस्तावर ... पूर्वीच आशा ठेवली होती, त्या आम्हाकडून त्याच्या गौरवाची स्तुती व्हावी.

ज्याच्यामध्ये तुम्ही भरवसा देखील केला....

आता हे पहा, बारकाईने. तुमचे जॅकेट घाला - सुवार्ता जॅकेट. तुमचे कान उघडे ठेवा, बारकाईने ऐका. मी तेराव्या पदावर आहे.

तुम्ही ही, सत्याचे वचन,... म्हणजे तुमच्या तारणाविषयीची सुवार्ता ऐकून घेतल्यानंतर ... [विश्वास वचन ... ऐकण्याने येतो (मंडळी म्हणते "देवाचे.")] त्याच्यावर विश्वास ठेवला,...

सत्य काय आहे? देवाचे वचन. ते बरोबर आहे? योहान १७:१७, तुम्ही जे शास्त्रलेख लिहून घेत आहात. येशू म्हणाला, "तुझ्या सत्याद्वारे, पित्या, त्यांना पवित्र कर: तुझे वचन सत्य आहे."

57 ... तुम्ही सत्य ... ऐकल्यानंतर ... तुमच्या तारणाची सुवार्ता....

तारण काय होते जे तो त्यांना सांगण्याचा प्रयत्न करीत होता? पृथ्वीच्या उत्पत्ती अगोदर पूर्वनिर्धारित (ते बरोबर आहे?), पुत्राच्या दत्तकपणासाठी. अनंत जीवनासाठी पूर्वनिर्धारित. आता, तुम्ही अनंत जीवनात आल्यानंतर - तुमचे तारण झाल्यानंतर, पवित्रीकरणानंतर, पवित्र आत्म्याने भरलात - तुम्ही पुत्र आहात; आता देवाला तुम्हाला योग्य पदावर स्थानापन्न करायचे आहे जेणेकरुन तुम्ही त्याच्या राज्यासाठी आणि त्याच्या गौरवासाठी कार्य करु शकता.

तीच सुवार्ता आहे. प्रथम, वचन ऐका: "पश्चाताप करा, आणि तुमच्या पापांची क्षमा व्हावी म्हणून येशू ख्रिस्ताच्या नावामध्ये बाप्तिस्मा घ्या." - तुमची सर्व पापे दूर केली जातील, वचनदत्त देशासाठी प्रभू येशू ख्रिस्ताच्या नावाचा धावा करा. अभिवचन हे प्रत्येक प्रवाशाला आहे जो तुमच्या मार्गावर आहे. जर आज रात्री तुम्ही तुमचे घर पापी असे सोडले, म्हणत, "मी ब्रॅन्हम प्रार्थनामंदिरामध्ये जाईन," देव आज रात्री तुम्हाला संधी देतो. तेथे तुम्हामध्ये आणि वचनदत्त देशामध्ये एक गोष्ट आहे. वचनदत्त भूमी काय आहे? पवित्र आत्मा.

यहोशवा आणि वचनदत्त भूमी यांच्यामध्ये काय होते, ती यार्देन होती. अगदी बरोबर.

58 मोशेने, ख्रिस्ताचे प्रतीक असल्याने, मुलांचे वचनदत्त भूमीपर्यंत नेतृत्व केले, मग.... मोशेने मुलांना वचनदत्त भूमीत नेले नाही; यहोशवाने लोकांना आत नेले आणि भूमी वाटून दिली. येशूने किंमत भरली, त्यांना पवित्र आत्म्यापर्यंत नेले. देवाने पवित्र आत्मा खाली पाठविला आणि त्याने मंडळीला योग्य पदावर स्थानापन्न केले, प्रत्येक माणसाला, त्याच्या अस्तित्वाने त्याला भरले. तुम्ही पहा माझा म्हणण्याचा अर्थ काय? सर्वकाही ख्रिस्त येशूमध्ये - कसे या सुवार्तेद्वारे देवाने पाचारणाने पूर्वनिर्धारित केले.

पौलाने, गलतीकरांस १:८ मध्ये, म्हणाला, "जर दूत येऊन काहीतरी प्रचार केला, तो शापित असो." - सत्य, सुवार्ता. आता बारकाईने ऐका जेव्हा आपण पुढे वाचतो, पद संपवितो:

... तुमच्या तारणाविषयीची सुवार्ता: त्याच्यावर [बारकाईने ऐका] विश्वास ठेवला, आणि त्याने देऊ केलेल्या पवित्र आत्म्याच्या अभिवचनाने तुम्हावर त्याच्याठायी शिक्का मारण्यात आला आहे,

59 शेवटच्या दिवसात, पवित्र शास्त्र म्हणते (आता पहा) शेवटच्या दिवसात तेथे दोन वर्गाचे लोक असणार आहेत. त्यातील एकावर देवाचा शिक्का असणार आहे; दुसऱ्यावर पशुची खूण असणार आहे. ते बरोबर आहे?किती जणांना ते ठाऊक आहे? बरे, जर देवाचा शिक्का पवित्र आत्मा आहे, मग पवित्र आत्म्याविना असणे ही श्वापदाची खूण आहे. आणि पवित्र शास्त्र म्हणते की ते दोन आत्मे इतके निकट असतील एकत्र की जर शक्य असेल तर प्रत्यक्ष निवडलेल्यांस देखील फसविल. तो ते कधीही करणार नाही, कारण ते अनंत जीवनासाठी निवडलेले होते, पहा.

मंडळी अगदी अशा प्रकारे जात आहे [अस्पष्ट शब्द]

60 प्रभूला भेटण्यासाठी दहा कुमारी निघाल्या, सर्व पवित्रीकरण झालेल्या, सर्व पवित्र. त्यातील प्रत्येक जण पवित्रीकरण झालेल्या होत्या. पाच जणी मंद होत्या आणि त्यांनी त्यांचा उजेड जाऊ दिला, पाच जणींच्या दिव्यात तेल होते, आणि, "पहा, वर येत आहे." आणि पाच जणी ज्यांच्या दिव्यांमध्ये तेल होते त्या लग्नाच्या मेजवानीस आत गेल्या; आणि दुसऱ्या बाहेर राहिल्या जेथे रडणे आणि ओरडणे आणि दातखाणे होते. तयार रहा, कारण तुम्हास ठाऊक नाही कोणत्या मिनिटाला प्रभू येईल. पवित्र शास्त्रात तेल कशाला दर्शविते? पवित्र आत्मा.

61 आता तुम्ही सेव्हन डे ॲडवेंटिस्ट भावांनो जे म्हणता सातवा दिवस हा देवाचा शिक्का आहे, त्याला सिद्ध करण्यासाठी एक शास्त्रलेख दाखवा. पवित्र शास्त्र म्हणते की पवित्र आत्मा देवाचा शिक्का आहे. हे पहा. आता तेरावे पद पहा.

...तुम्ही विश्वास केल्यानंतर, अभिवचनाच्या पवित्र आत्म्याद्वारे तुम्ही मुद्रित झाला आहात.

इफिसकरांस ४:३० मध्ये वळा, मी विश्वास करतो ते ते आहे. पहा जर आपण ... ४:३० काढा, पहा जर ते समानच नाही का. इफिसकरांस, चवथा अध्याय आणि तेरावे पद. होय, येथे ते आहे, ४:३०:

देवाच्या पवित्र आत्म्याला खिन्न करु नका, खंडणी भरुन प्राप्त केलेल्या मुक्तीच्या दिवसापर्यंत तुम्ही त्या आत्म्याच्या योगे मुद्रित झाला आहात.

62 किती वेळ? जेव्हा तुम्हाला खरोखर पवित्र आत्मा प्राप्त झाला, तो तुम्हाला किती काळापर्यंत टिकला? पुढच्या संजीवनापर्यंत, आजी तुमचा मार्ग ओलांडेपर्यंत, मालकाने तुम्हावर खेकसण्यापर्यंत? तुमच्या मुक्तीच्या दिवसापर्यंत! हालेलूया!

तुम्ही मृत्यू पावल्यानंतर, तुम्ही त्या भूमीमध्ये गेल्यानंतर, की तुम्ही तेथे तुमच्या प्रियजनाबरोबर उभे असल्यानंतर, तेव्हा ही तुम्ही पवित्र आत्म्याने भरलेले असता. (शास्त्रलेख.) तुम्ही अगदी तसेच असता जसे आता आहात, केवळ तुमच्याकडे आहे ... तुम्ही दुसऱ्या शरीरात प्रवेश करता. तुम्ही फक्त घर बदलता. हे एक जुने झाले आहे. तुम्ही त्यावर नावाची पाटी यापुढे अडकवू शकत नाही, छपराचा वासा सडला आहे. ते बरोबर आहे. तेव्हा तुम्ही अगदी जुनी गोष्ट सोडून देता आणि तिला खाली सडू देता, आणि नव्यामध्ये प्रवेश करता. ते बरोबर आहे? "कारण जर पृथ्वीवरील मंडप मोडला, तर आपल्याकडे एक वाट पाहत आहे."

63 तुम्हाला लक्षात आहे त्या दिवशी, त्यामधून जात होतो? जेव्हा लहान बाळ आईच्या गर्भाशयात घडत असते, आणि त्याचे लहान स्नायू लाथाडत असतात आणि उड्या मारीत असतात आणि चाललेले असते.... परंतु आई बाळाला जन्म देते न देते तोच आणि बाळ पृथ्वीवर येताच, पहिली गोष्ट तेथे त्या नैसर्गिक शरीराला धरण्यासाठी आत्मिक शरीर असते. कदाचित वैद्य त्याला देतात [भाऊ ब्रॅन्हम टाळी वाजवतात.] अशा प्रकारे, किंवा काहीतरी, किंवा हलवितात, आणि "वॅ, वॅ, वॅ." आणि लागलीच पटकन आईच्या स्तनाजवळ ते जाते, "मम-मम-मम," त्याचे लहान डोके ते वर आणि खाली आईच्या स्तनाजवळ नेते त्या दुधाच्या नसांना दूध आणण्यासाठी.

एक लहान वासरु, ते आईपासून पडते न पडते तोच, ते काही मिनिटात त्याच्या लहानशा गुडघ्यांवर उभे राहते. ते काय करील? ते सरळ मागे सभोवती हालचाल करते, ते आईला धरते, आणि त्याचे लहानसे डोके खाली आणि वर हलविण्यास सुरुवात करते अशाप्रकारे, आणि त्याचे दूध घेते. हालेलूया!

होय, महाशय, जेव्हा हे नैसर्गिक शरीर पृथ्वीवर येते, तेथे आत्मिक शरीर त्याची वाट पाहत असते.

आणि जेव्हा हे नैसर्गिक शरीर जमिनीवर पडते, हालेलूया, तेथे एक पलीकडे वाट पाहत असते. आपण फक्त एकातून दुसऱ्यामध्ये प्रवेश करतो, आपण आपले वास्तव्याचे स्थान बदलतो. या मर्त्य शरीराने अमरत्व परिधान करायलाच हवे; या आत्मिक ... हे जे विनाशी त्याने अविनाशीपण परिधान करायला हवे. हे वृद्ध सुरकुतलेले, खंगलेले, वाकलेले शरीर.... परंतु ते त्याचे दिसणे अजिबात बदलणार नाही - मला म्हणायचे आहे, जेव्हा ते पलीकडे जाईल तुमच्याकडे अजूनही तोच आत्मा असेल.

64 मला तुम्हाला काहीतरी लहानसे पेच पडण्यासारखे देऊ द्या, परंतु ते पवित्र शास्त्रात आहे. मग मी तुम्हाला एक असे देईन जे तुमच्यासाठी पेच सोडवील. हे एक पहा. जेव्हा वृद्ध शौल, राजा, एक मोठा वृद्ध संप्रदायाचा प्रचारक तेथे खाली त्या वेळेस, तुम्हाला माहित आहे, ज्याचे मस्तक आणि खांदे सर्वांच्या वर होते ... आणि घाबरत होता. त्याला अलौकिकाबद्दल काही एक ठाऊक नव्हते. दाविदाला यावे लागले आणि सिंहाच्या मुखातून मेंढराला सोडवावे लागले, गल्याथाला ठार केले. त्याला पहा. तो देवापासून इतका मागे गेला, की तो या पवित्र लोळणाऱ्या

प्रचारकाचा द्वेष करु लागला. आणि त्याच्याबरोबर असण्याऐवजी, त्याला मदत करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी, तो त्याच्या विरुद्ध झाला. जर तेच अगदी तंतोतंत चित्र नाही का, तंतोतंत चित्र. सरळ त्याच्यापासून वळला.

65 जेव्हा मी माझ्या पहिल्या दौऱ्याला निघालो आणि दाविदाने गल्याथाला ठार केले ह्याचा प्रचार केला जेव्हा मी निघालो, तेव्हा येथे कितीजण होते? कित्येक ... काही, एक काही जुन्या समयातले. मी परत एकदा जाण्याच्या बेतात आहे. लक्षात ठेवा, आपण काय पाहतो ... गेल्या रविवारी हे सभोवती आले? ते सरळ दुसऱ्या टप्प्यात जात आहे. दाविदाची दुसरी मोहीम, त्याच्या सेवेचा दुसरा टप्पा, ते तंतोतंत बरोबर आहे. जे, त्यानंतर तो इस्राएलावर राजा झाला. लक्ष द्या सेवा ही आता मोठ्या टप्प्यामध्ये जात आहे, अजून महान येत आहे. तसेच दावीदाने ही केले. आता लक्ष द्या याकडे जसे ते आले - दावीद, ओह, जेव्हा देवाने दाविदाला येऊन, सिंहाला ठार करु दिले, लक्ष द्या, आणि अस्वलाला ठार केले, मग पलिष्ट्याला ठार केले.

आता, तेथे एक समय आला जेव्हा देवाने एक वाईट आत्मा या वृद्ध मुलावर दिला. आणि कशासाठी? दाविदाचा द्वेष करण्यासाठी. आणि मी विश्वास करतो....

66 (आता, या ध्वनिमुद्रणपट्ट्या: आता ऐका, भावांनो, तुम्ही या ध्वनिमुद्रण पट्ट्यांवर आहात, जर तुम्ही माझ्याशी असहमत असाल, मला क्षमा करा. पहा, मी तुम्हाला प्रेम करतो. कसेहीकरुन मी तुम्हाला तेथे पलीकडे भेटणार आहे, पहा, कारण तू जर देवाचा माणूस आहे कसेहीकरुन मी तुम्हाला भेटणार आहे.) परंतु मला हे म्हणायचे आहे. येथे कारण आहे: फक्त कारण की शौलाने पाहिले की दाविदाकडे काहीतरी होते जे त्याच्याकडे नव्हते. मग काय झाले?

एक लहानसहान तांबूस वर्णाचा, लहानसा ... पवित्र शास्त्र म्हणते तो तांबूस वर्णाचा होता. तो खूप गोरा मुलगा नव्हता. तांबूस हा अगदी लहानसा एक प्रकारचा माणूस आहे. आणि तो तेथे बाहेर गेला. आणि शौल, जेव्हा त्याने शौलाची शस्त्रास्त्रे त्याच्यावर घातली, मी कल्पना करतो ढाल सरळ त्याच्या पायावर आली. आणि तो म्हणाला, "हे माझ्यावरुन काढून टाका." कदाचित त्याने त्याला डॉक्टरची पदवी, पी.एच.डी, किंवा एल.एल.डी, किंवा काहीतरी दिले असेल, तुम्हाला माहित आहे. परंतु तो म्हणाला, "मला त्याबद्दल काही एक ठाऊक नाही, कारण मी कधी त्याचा सराव केला नाही. मला हे घेऊ द्या जे मला ठाऊक आहे मी त्याबरोबर काय करीत आहे." होय, महाशय. त्याने गोफण गुंडा घेतला.

67 आणि त्याने दाविदाला ... वेडे केले कारण मुली, मंडळ्या गात होत्या, "शौलाने त्याचे हजारो वधिले असतील, परंतु दाविदाने त्याचे लाखो वधले."

मग तो मत्सरी झाला. ("तो जुना येशू नावाचा गोंधळ, त्यामध्ये काही नाही.") ते बरोबर आहे. आणि देवाने त्याला काय केले? देवाने एक दुरात्मा त्याच्यावर पाठविला दाविदाचा द्वेष करण्यासाठी, आणि त्याने विनाकारण दाविदाचा द्वेष केला.

दाविदाने काही वेळेस त्याची मान पिळली असती. तो करु शकत होता, परंतु त्याने ते जाऊ दिले. तो अगदी कधीही काहीही बोलला नाही. तो निश्चित ते करु शकला असता. तो तेथे गेला आणि त्याच्या झग्याचा काठ कापून घेतला एके रात्री, परत आला, म्हणाला, "येथे पहा! तू पहा?" होय, महाशय. तो ते करु शकला असता, परंतु त्याने त्याला एकटे सोडून दिले. तो त्याच्या मंडळीला तोडून, त्यांना विखरु शकला असता, आणि स्वतःची संस्था सुरु केली असती जर त्याला वाटले असते. परंतु त्याने ते केले नाही. त्याने फक्त शौलाला जाऊ दिले. देवाला लढू द्या. होय, महाशय.

68 तेव्हा जसा तो बाहेर गेला, आणि मोहीम संपली, आणि सुरु झाली, तो दुरात्मा आला जेणेकरुन शौलाला देवाकडून उत्तर मिळेनासे झाले. काही काळानंतर देवाचा आत्मा त्याच्याकडून निघून गेला. आणि वृद्ध शमुवेल, तो एक ज्याला त्यांनी नाकारले होते, तो एक जो खरोखर त्यांच्यासाठी देवाची वाणी होता, तो एक ज्याने त्यांना सांगितले, त्यांनी अगदी जगाप्रमाणे वर्तन करण्याअगोदर....

मंडळीला जगाप्रमाणे का वर्तन करावेसे वाटते? पेन्टिकॉस्टल बाप्तिस्मा झालेले, पवित्र आत्म्याचा अनुभव असलेले मेथडिस्ट आणि बॅप्टिस्ट आणि प्रेसबायटेरियन, यांना का जगासारखे वर्तन करावेसे वाटते? ते तसे का करतात? मला ठाऊक नाही. मी अगदी ते समजू शकत नाही. तुम्ही म्हणता, "बरे, पोकर खेळण्यात मजा नाही का.... अगदी थोडीशी मजा, अगदी थोडीशी मामुली पैशाने," जे काही तुम्ही त्याला म्हणता. ते पाप आहे. त्या गोष्टी तुमच्या घरात असता कामा नये. "का, तेथे बाहेर लहानसे बियरचे ग्लास घेण्यात काही हानी नाही. आम्ही फक्त थोडीशी घेतली. मी आणि माझ्या पत्नीने दुपारी थोडीशी घेतली." आणि पहिली गोष्ट तुम्हाला माहित आहे, तुमची मुले काही घेतील. निश्चित ते घेतील.

69 आणि तुम्ही स्त्रिया, उ! सैतानाने अगदी केले आहे.... तेच काय ते त्याने प्रारंभी केले, आणि त्याने नक्कीच तुम्हाला लक्ष्य केले आहे बहिणींनो. तो ते फक्त यासाठी करतो कारण त्याला ठाऊक आहे तो काय करु शकतो. तो स्त्रीला पुरुषापेक्षा हजारपट जलद फसवू शकतो. मला ठाऊक आहे त्याने तुमच्या भावना दुखावतात, परंतु ते सत्य आहे. ते अगदी तंतोतंत आहे. तेच काय ते त्याने एदेनच्या बागेत केले. तो करु शकतो.... आता, ती प्रामाणिक होती, ती सच्ची होती; परंतु ती फसली. "आदाम फसला नाही," पवित्र शास्त्र म्हणते. तो फसला नाही, परंतु ती फसली. तेव्हा तो तिला फसवू शकतो.

आणि तरीही पाळक सरळ बाहेर जातो आणि स्त्रीला प्रचारक नेमतो, अशा प्रकारे त्यांना मंडळीवर ठेवतात, आणि हे पवित्र शास्त्र उत्पत्तीपासून ते प्रकटीकरणापर्यंत दोषी ठरविते. तुम्ही म्हणता, "बरे, ते सर्व ठीक आहे. ते सर्व ठीक आहे. त्या अगदी तशा प्रकारेच प्रचार करु शकतात जसे.... मला ठाऊक आहे ते बरोबर आहे."

70 जसे एकदा कोणीतरी अन्यभाषेत बोलू लागले. मी अगदी प्रचार करीत राहिलो. आणि जेव्हा मी बाहेर पडलो, एक स्त्री माझ्या मुलाला

म्हणाली, "उद्या रात्री देण्यासाठी माझ्याकडे एक संदेश आहे," म्हणाली, "जेव्हा तुझे वडील व्यासपीठावर येतील."

म्हणाला, "संदेश, तुला काय म्हणायचे आहे?"

आणि त्या रात्री जेव्हा ते तयार झाले, जेव्हा मी वेदीवर पाचारण करण्याच्या बेतात होतो, तिने तिचे केस सर्व वर बांधले आणि तिचे पायमोजे वर खेचले आणि सर्वकाही, तयार झाली. जागेच्या मधोमध उडी मारली आणि खाली वर उड्या मारु लागली, अन्यभाषेत बोलली आणि भविष्यवाणी केली. मी फक्त प्रचार करीत राहिलो, माझे वेदीवरचे पाचारण केले. बरे, मी अगदी खरोखर त्या गोष्टीला कणभर ही मान दिला नाही. ते बरोबर नव्हते. तेव्हा मग.... बरे, पवित्रशास्त्र म्हणते करु नये. म्हणते, "संदेष्ट्याचे आत्मे संदेष्ट्याच्या अधीन असतात." देव ... देव व्यासपीठावर बोलत आहे, त्याला बोलू द्या. पौल म्हणाला, "जर कोणाला काही प्रकट झाले, त्याने गप्प राहावे जोपर्यंत पुढचा त्याचे बोलणे संपवीत नाही." ते बरोबर आहे.

आता, मग जेव्हा मी बाहेर आलो, ते लोक म्हणाले, लोकांचा मोठा जमाव, म्हणाला, "आज रात्री तू पवित्र आत्म्याला खिन्न केले."

मी म्हणालो, "काय करुन? मी काय केले?"

म्हणाले, "बरे, जेव्हा त्या बहिणीने तो संदेश दिला, हालेलूया," म्हणाले, "ते....

"का," मी म्हणालो, "मी प्रचार करीत होतो. ती नियमाबाहेर होती."

"ओह," म्हणाले, "ते सरळ सिंहासनावरुन ताजे होते. ते तू जे काही प्रचार करतो त्याहून ताजे होते." हू!

71 आता, ते फक्त तुम्हाला दर्शविते. ते दाखविते एकतर हे - आणि मी ते आदराने सांगतो - एकतर वेडेपणा, किंवा एकतर अनादर, किंवा अशिक्षित शिकवण ज्याला देवाबद्दल अधिक माहिती नाही जेवढे सशाला बर्फाच्या बुटाबद्दल माहित आहे. आता, ते मी मूर्खशेरा म्हणून म्हणत नाही, कारण ही विनोद करण्याची जागा नाही. परंतु ते अगदी तंतोतंत सत्य आहे. एक व्यक्ती जो ... ज्याला माहित आहे की देव गोंधळाचा लेखक नाही. तो शांतीचा आहे. पवित्रशास्त्र त्यांना ठाऊक नाही. सर्वकाही त्यांना ठाऊक आहे ते कसे करायचे ते वर आणि खाली उड्या मारायच्या, अन्य भाषेत बोलायचे, म्हणायचे, "माझ्याकडे पवित्र आत्मा आहे. हालेलूया!"

आफ्रिकेमध्ये, मी उभा राहिलो आहे आणि पाहिले आहे, चेटकिणी आणि इतर बोलतात (एका वेळेस त्यांच्यातील पाच हजार), खाली वर उड्या मारतात, त्यांच्या चेहऱ्यावर सर्वत्र रक्त, अन्य भाषेत बोलतात, आणि मानवाच्या कवटीतून रक्त पितात; सैतानाला बोलावितात, आणि अन्य भाषेत बोलतात.

72 आणि तरीही अन्यभाषेत बोलणे ही देवाकडून वरदान आहे; परंतु तो पवित्र आत्म्याचा अचूक पुरावा नाही. आता मला तुम्हाला ते सांगू द्या. मी विश्वास करतो की सर्व प्रेरित संत अन्यभाषेत बोलले आहेत. मी विश्वास करतो एक माणूस काही काळा अगोदर ... जेव्हा तुम्ही देवाबरोबर इतके प्रेरित होता की तुम्ही अन्यभाषेत बोलता. मी तो विश्वास करतो. परंतु मी विश्वास करीत नाही की तुम्हाला पवित्र आत्मा मिळाल्याचा ते कोणते चिन्ह आहे. होय, महाशय.

मी विश्वास करतो तेथे समय असतो जेव्हा तुमच्याकडे विश्वास असतो - एक व्यक्ती - तुम्ही सरळ बाहेर जाता आणि लहान बाळावर हात ठेवता ज्याला कर्करोग आहे (जेव्हा पन्नास प्रचारकांनी त्याच्यासाठी प्रार्थना केली होती), आणि ते बरे झाले कारण त्या आईला त्या बाळासाठी विश्वास होता. देवाने ते तिला दिलेले आहे, ती ख्रिस्ताच्या शरीराचे अंग आहे. होय, महाशय, मी तो विश्वास करतो. मी ते करताना पाहिले आहे आणि मला ठाऊक आहे ते सत्य आहे. परंतु, मंडळीला योग्य क्रमात घेण्याबाबत, काय, एका क्रमात बसविणे जेणेकरुन आपण कार्य करु शकू.

73 आता आपण जाण्यापूर्वी राहिलेले हे पद पूर्ण करुया.

...तुम्ही प्राप्त केल्यानंतर, तुम्ही पवित्र आत्म्याच्या अभिवचनाने मुद्रित झाला आहात.

मुद्रित - मुद्रा काय आहे? मुद्रा काय आहे? शिक्का हा: प्रथम गोष्ट ते दाखविते की कार्य पूर्ण झाले आहे, पूर्ण कार्य; पुढची गोष्ट ते मालकी दाखविते; आणि पुढची गोष्ट ते सुरक्षितता दाखविते, त्याला राखते.

म्हणा, उदाहरणार्थ, मी पेन्सिल्वेनिया रेलरोड कंपनीमध्ये नोकरी करीत असे. मी माझ्या वडिलांबरोबर रेलरोड कंपनीमध्ये नोकरी करीत असे. आम्ही गाड्यांचे डब्बे लादण्याचे काम करीत असू. आणि आम्ही, पॅकिंग कंपनीमध्ये येथे खाली टाकीत असू, आम्ही अल्युमिनियम डब्यात टाकीत असू. आणि आम्ही काही वर ठेवीत असू, आणि काही येथे खाली ठेवीत असू, आणि काहीवर अशा प्रकारे. परंतु त्या गाड्यांच्या डब्यांना शिक्का मारण्याअगोदर, तेथे निरीक्षक येत असे. आणि तो त्याला ढकलीत असे, या एकाला लोटीत असे, त्या एकाला हलवीत असे. "आह ... नापसंत आहे! तेथे पोहोचण्याअगोदर ते सर्व तुकड्यात तोडतील. याला नापसंत करा! त्यांना बाहेर काढा. ते परत करा." निरीक्षकाने गाडी नापसंत केली.

74 पवित्र आत्मा निरीक्षक आहे. तो तुम्हाला थोडेसे हलवील, आणि तुम्ही खडखडाट कराल. "तुम्ही देवाची सर्व वचनांचा विश्वास करता?"

"मी तो जुना येशू नावाचा मामला विश्वास करीत नाही."

“त्याला नापसंत करा.” तुम्ही खडखडाट करता, पहा.

“मी दैवी आरोग्यावर विश्वास करीत नाही. तेथे अशी कोणती गोष्ट नाही.” अजून ही खडखडाट. त्याला बाहेर काढा.

“तुम्ही विश्वास करता येशू ख्रिस्त काल....”

“बरे, काही बाबतीत.”

“तुम्ही खडखडाट करता. त्याला बाहेर लाथ मारा, तो अजून तयार नाही.” होय, महाशय.

भावा, जेव्हा तो “आमेन!” म्हणण्यास तयार होईल....

तू पवित्र आत्मा प्राप्त केलास काय? “आमेन!” सर्वकाही पूर्ण झाले काय? “आमेन!” मग निरीक्षक काय करतो? सर्वकाही चांगले घट्ट भरले आहे, संपूर्ण सुवार्तेने. ओह, “देवाचा प्रत्येक शब्द चांगला आहे. सर्वकाही परिपूर्ण आहे. मी प्रत्येक वचनाचा विश्वास करतो. आमेन! आमेन! आमेन!” तू विश्वास करतोस देव अजूनही आरोग्य देतो? “आमेन.” तू विश्वास करतोस येशू काल, आज, आणि युगानुयुग सारखा आहे? “आमेन.” तू विश्वास करतो पवित्र आत्मा इतका वास्तविक आहे जितका कधी होता? “आमेन.” तू विश्वास करतो तोच आत्मा पौलावर पडला जो आपल्यावर पडला? “आमेन.” तू विश्वास करतोस तो त्याच गोष्टी आपल्यावर करतो ज्या त्याने त्यांच्यावर केल्या? “आमेन.” ओह-ओह, ती आता घट्ट होत आहे. पहा, आता घट्ट होत आहे, आम्ही दरवाजा बंद करण्यास तयार आहोत. ठीक आहे.

75 मग निरीक्षक दरवाजा बंद करतो. तो काय करतो? तो त्यावर शिक्का मारतो. मग तो येथे खाली येतो आणि त्या गोष्टीचा लहानसा खांब धरतो, तेथे जातो त्या लहानशा गोष्टीकडे, आणि त्याला शिक्का मारतो. बरे होईल की तुम्ही तो फोडणार नाही. जर ती गाडी ... तिचे गंतव्य स्थान बोस्टन आहे, तो तोडला जाऊ शकत नाही - त्या शिक्याला तोडणे तुरुंगात जाण्यासारखा गुन्हा असेल - जोपर्यंत ती बोस्टनमध्ये पोहचत नाही.

आणि मनुष्य ज्याला अधिकार आहे तोच तो शिक्का खोलू शकतो, आणि केवळ तोच. ते बरोबर आहे. तो अमुक अमुक रेलरोड कंपनीच्या मालकीचा आहे. तो त्यांचा शिक्का आहे. ते त्यांचे आश्वासन आहे की ही गाडी सीलबंद होती, ही गाडी तयार आहे, ती त्यांच्या मालकीची आहे. ते बी अँड ओ पेन्सिल्वेनियावर टाकू शकत नाही.

तुम्हाला मुद्रित व्हावे लागेल, आणि जेव्हा ते मुद्रित होते....

76 आणि जेव्हा ख्रिस्तीजन सुवार्तेने भरतो, देवाच्या चांगुलपणाने भरतो, देवाच्या सर्व चांगल्या गोष्टी त्याच्यामध्ये राहतात, उघड्या हृदयाने, कार्यासाठी तत्पर, योग्य पदावर स्थानापन्न होण्यासाठी इच्छा करतो, ते सर्वकाही करतो जे पवित्र आत्मा त्याला करण्यासाठी सांगतो, मृत्यूमधून जीवनात पार गेलेला आहे, जगाच्या सर्व गोष्टींपासून पवित्र झालेला आहे, जसा प्रकाश त्याच्याकडे येतो तो प्रकाशात चालतो, पुढे जात राहतो, तो तयार आहे. मग देव जगाचे दरवाजे त्याच्यापाठी बंद करतो, आणि एकत्र अशा प्रकारे लाथ मारतो, आणि अभिवचनाच्या पवित्र आत्म्याने त्याला मुद्रित करतो. हालेलूया!

किती काळापर्यंत? गंतव्य स्थानापर्यंत. रेलरोडच्या रुळावर त्याला बाहेर काढून, तोडून उघडून, पाहत नाही की जर सर्वकाही परत ठीक आहे. ते ठीक आहे, अगदी त्याला एकटे सोडा. निरीक्षकाने त्याचे निरीक्षण केले आहे. किती काळापर्यंत तू मुद्रित आहेस? तुमच्या उद्धाराच्या दिवसापर्यंत. तेवढ्याच जेवढ्या वेळापर्यंत तुम्ही मुद्रित आहात.

“बरे, जेव्हा तुम्ही मरता, मग, भाऊ ब्रॅन्हम, तुम्ही मेल्यानंतर काय? तुम्ही म्हणालात तुम्हाकडे अजूनही तो असतो.” तुम्हाकडे तो सर्वकाळासाठी असतो. जीवनाची सुरुवात कोठे होते? वेदीजवळ. अगदी तेथेच तुम्ही लहानशी सावली पाहता. ती सावली, पवित्र आत्म्याचा शिक्का आहे. मग ती सावलीची सावलीची सावली असते, जसे मी त्या रात्री म्हणालो. परंतु जेव्हा तुम्ही मरता.... तुम्ही त्या सावलीतून जात असता जोपर्यंत तुम्ही बाष्पाकडे येत नाही, बाष्पाकडून लहानशा पाझरणाऱ्या झऱ्याकडे, झऱ्याकडून खाडीकडे, खाडीकडून नदीकडे, नदीकडून समुद्राकडे, पहा, देवाच्या प्रीतिच्या. तुम्ही अगदी तीच व्यक्ती असता.

77 येथे पहा. वृद्ध शौल, वृद्ध पतितावस्थेत गेलेला, तो देवाकडे येऊ शकत नव्हता, तरीही तो नाशात गेला नव्हता. तो नक्कीच गेला नव्हता. तो संदेष्टा होता, परंतु तो अगदी देवाच्या बाहेर गेला होता. (तेच कारण आहे, भावांनो, मी म्हणालो तुम्ही नाश पावला नाहीत.) तेव्हा मग लक्षात ठेवा, तो फक्त देवाच्या इच्छेबाहेर गेला होता. तेव्हा मग पहिली गोष्ट तुम्हाला ठाऊक आहे, तो सहमत होत नव्हता. (आता, कदाचित मी ते म्हणायला नको हवे होते. ठीक आहे, मी फक्त आज रात्री आनंदी मंडळीसाठी जात आहे.) तेव्हा मग, तुम्हाला ठाऊक आहे, आणि पहिली गोष्ट तुम्हाला माहिती आहे, ओह, माझ्या, मग तो उरीम थुम्मीमाकडे गेला.

तुम्हाला ठाऊक आहे उरीम थुम्मीम काय होते. ते एफोद होते जे अहरोन घालीत असे, तो ऊरपट होता. आणि तो नेहमी ... देव नेहमी अलौकिक देव आहे, अलौकिक मार्गाने उत्तर देतो. आणि जेव्हा संदेष्टा भविष्यवाणी करतो, आणि तो गूढ प्रकाश त्या उरीम थुम्मीमावर येत नाही, तो चुकीचा होता. जेव्हा स्वप्न पाहणारा स्वप्न सांगतो आणि उरीम थुम्मीमावर प्रकाश चमकत नाही, मी पर्वा करीत नाही ते किती चांगले वाटते, ते चुकीचे होते. ते बरोबर आहे.

78 आणि मी पर्वा करीत नाही अगदी किती डॉक्टरच्या पदव्या तुम्ही घेतल्या आहेत आणि किती मोठा तुमचा संप्रदाय आहे, जेव्हा तुम्ही भविष्यवाणी करता किंवा प्रचार करता आणि ते वचनानुसार नसेल, तू चुकीचा आहेस, भावा. हे देवाचे उरीम थुम्मीम आहे. जेव्हा तुम्ही म्हणता

तुम्ही जगाच्या स्थापनेपूर्वी पूर्वनिर्धारित नाही, ते चमकणार नाही, कारण पवित्र शास्त्र म्हणते तुम्ही आहात. जेव्हा तुम्ही म्हणता की तुम्ही पिता, पुत्र, आणि पवित्र आत्म्याच्या नावात बाप्तिस्मा घ्यावयास हवा, ते चमकत नाही, कारण पवित्र शास्त्रात कधीही कोणी त्या प्रकारे बाप्तिस्मा घेतला नाही; केवळ प्रभू येशूच्या नावात घेतलेला आहे. ते चमकणार नाही, तेव्हा तेथे कुठेतरी काहीतरी चुकीचे आहे.

79 तेव्हा उरीम थुम्मीमाद्वारे वृद्ध शौलाला उत्तर मिळत नव्हते, आणि त्याला स्वप्न ही पडत नव्हते. तो इतका दूर गेला होता की त्याला स्वप्न ही पडत नव्हते. तेव्हा तुम्हाला ठाऊक आहे त्याने काय केले? तो भूतविद्या प्रवीण स्त्रीकडे गेला आणि - ही म्हातारी चेटकीण, म्हातारी तेथे खाली भूतविद्या प्रवीण, म्हातारी चेटकीण - आणि तो म्हणाला, "तू भूतविद्येचा प्रयोग करु शकते?"

ती म्हणाली, "होय, परंतु शौल म्हणाला आहे जो कोणी भूतविद्या प्रवीण आहे त्या सर्वांना तो ठार करील."

तो म्हणाला, "मी तुझे रक्षण करीन." नोकरासारखा पेहराव केला होता. तो म्हणाला, "माझ्यासाठी भूतविद्येचा प्रयोग करुन, मृतांच्या जगातून जे पलीकडे गेले आहेत [आता याकडे ऐका.], त्यातून येथे शमुवेल संदेष्ट्याचा आत्मा आण."

आणि ती भूतविद्येच्या प्रयोगात गेली. आणि जेव्हा तिने केले, ती उपडी पडली. ती म्हणाली, "मी देवांना वर येताना पाहत आहे." पहा, ती अधार्मिक होती. देव, त्यांच्यातील दोन किंवा तीन - जसे पिता, पुत्र, आणि पवित्र आत्मा, किंवा त्यासारखे काहीतरी, तुम्हाला माहित आहे. ती म्हणाली, "मी देवांना वर येताना पाहत आहे."

म्हणाला, "मला वर्णन कर. तो कसा दिसतो? तो कशासारखा दिसत आहे?"

म्हणाली, "तो बारीक आहे आणि त्याच्या खांद्यावर झगा आहे." तो अजिबात बदलला नव्हता.

तो म्हणाला, "तो शमुवेल आहे. त्याला या खोलीत आण. त्याला येथे माझ्यासमोर आण."

आणि पहा जेव्हा शमुवेल शौलासमोर आला. तो म्हणाला, "तू मला का बोलाविलेस, असे पाहता की तू देवाचा शत्रू झाला आहेस?" आणि पहा. तो अजूनही केवळ शमुवेल नव्हता, परंतु अजूनही त्याच्याकडे भविष्यवाणीचा आत्मा होता. म्हणा ते चुकीचे आहे, कोणालाही म्हणू दे हे चुकीचे आहे. ते सत्य आहे! तो अजूनही संदेष्टा होता. कारण तो म्हणाला, त्याने भविष्यवाणी केली आणि म्हणाला, "उद्या युद्ध तुझ्या विरुद्ध जाईल, आणि तू आणि तुझा पुत्र उद्या युद्धात पडतील, आणि या वेळेपर्यंत उद्या रात्री तू माझ्याबरोबर असशील." ते बरोबर आहे? तो अजूनही संदेष्टा होता!

आता तुम्ही म्हणता, "ओह, परंतु ती भूतविद्या प्रवीण स्त्री होती जिने ते केले."

80 ठीक आहे, मी तुम्हाला सांगेन केव्हा ती एक चेटकीण नव्हती. येशूने पेत्र, योहान, आणि याकोब यांना घेतले, आणि एकदा रुपांतराच्या डोंगरावर गेला, आणि डोंगराच्या शिखरावर उभा होता. आणि येशू ... देव त्याच्या पुत्राला स्थानापन्न करीत होता, जसा मी प्रयत्न करीत आहे ... त्या रात्री, पुत्राला स्थानापन्न केले. आणि जेव्हा त्यांनी केले, त्यांनी सभोवार पाहिले आणि त्यांना तेथे मोशे आणि एलीया उभे राहिलेले आढळले. ते बोलत होते, संभाषण करीत होते. सभोवती लहानसा सफेद झेंडा उडत नव्हता, किंवा खरंतर, लहानसा पांढरा ढग, उडत नव्हता, परंतु ती माणसे होती, जी बोलत होती. आठशे वर्षांपासून मोशे अचिन्हांकित कबरेत दफन केला गेला होता. आणि एलीया रथात बसून घरी गेला होता, पाचशे वर्षाअगोदर. आणि येथे ते दोघे, अगदी अजूनही तेवढेच जिवंत होते जेवढे कधी असतील, तेथे उभे राहून तो कलवरीवर जाण्या अगोदर त्याच्याशी बोलत होते. हालेलूया! "तुमच्या मुक्तीच्या दिवसापर्यंत मुद्रित झाले आहात."

81 मी त्वरा करीन, आणि मग आपण समाप्त करु कारण उशीर झालेला आहे; आणि आपण आजाऱ्यांसाठी प्रार्थना करणार आहोत. सुमारे अधिक पाच मिनिटे. चौदावे पद. थांबा, मला तेरावे वाचू द्या, त्याची पार्श्वभूमी मिळेल.

तुम्ही ... सत्याचे वचन ऐकून घेतल्यानंतर, तुमच्या तारणाविषयीची सुवार्ता....

आता लक्षात ठेवा, त्यांच्याकडे कोणते तारण होते? हे इफिसमधील ख्रिस्ती होते. आता पहा. तुम्ही करिंथकरांचे निरीक्षण केले का? त्याला नेहमी त्यांना सांगावे लागे, "जेव्हा मी तुमच्यामध्ये येतो, एकाकडे अन्यभाषा असते, एकाकडे अन्यभाषा असते, एकाकडे स्तोत्र असते, एकाकडे भविष्यवाणी असते, एकाकडे...." पहा, तो त्यांना काहीही शिकवू शकत नव्हता, कारण ते नेहमी हे, ते, किंवा दुसरे काहीतरी याची इच्छा बाळगीत होते. या लोकांकडे देखील त्याच गोष्टी होत्या, परंतु त्या त्यांच्याकडे नियमात होत्या. त्याने कधीही करिंथकरांस अशा प्रकारे शिकविले नाही; तो शिकवू शकत नव्हता. ते शिकविण्यासाठी मंडळी नियमामध्ये नव्हती. आता, तो या लोकांना वास्तविक गोष्ट शिकवू शकत होता.

परंतु ... तुमचे तारण: ज्याच्यामध्ये ... तुम्ही विश्वास ठेवला, तुम्हावर अभिवचनाच्या पवित्र आत्म्याने शिक्का मारण्यात आला,

तो विसार आहे [ओह, मला ते वगळून जाऊ देऊ नका.] आपल्या वतनाचा विसार ... देवाच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून, त्याच्या स्वकियजनांच्या खंडणी भरुन मिळविलेल्या मुक्तीसाठी.

हू!

82 पवित्र आत्मा काय आहे? (आता, मग मी बाकीचे खरोखर जलद वाचीन जर तुम्ही माझे इतके सहन कराल.) भाऊ माईक, त्या रात्री आपण कुठे होतो? जेथे ते सर्व आनंदित होते, ओह, सर्वकाही शांती होती. ते सिद्ध प्रेम होते. आता, प्रत्येक समयी तुम्ही या मार्गाने येता तुम्ही थोडेसे खाली टाकता. प्रत्येक समयी तुम्ही पाऊल उचलता, तुम्ही इंचाने निकट येता. जेव्हा ते पृथ्वीवर येते, तुमच्याकडे सावलीची सावलीची

सावली असते. आता, तेवढाच जेवढा पवित्र आत्मा तुमच्यामध्ये आहे. ते प्रेम आहे. परंतु, ओह, तुम्ही कशासाठी तरी तान्हेले आहात.

ओह, नाही.... लोक, जसे वृद्ध लोक ... कसे मला मागे जाऊन, परत पंधरा वर्षाचे व्हायला आवडेल, वीस! ओह, मी काहीही देईन. त्याने माझे काय चांगले होणार आहे? मी कदाचित पंधराचा होईन, आणि तरीही आज रात्री मरेन. ते अनिश्चित आहे. काय जर आज रात्री तुम्ही पंधरा वर्षाचे आहात? तुम्हाला काय ठाऊक तुम्ही घरी जाल तेव्हा आई जिवंत असेल किंवा नाही? तुम्हाला कसे ठाऊक तुम्ही घरी जाल? तुम्हाला कसे ठाऊक तुम्ही उद्या जगणार आहेत जर तुम्ही बारा वर्ष वयाचे आहात, आणि परिपूर्ण आरोग्यात आहात? तुम्ही कदाचित अपघातात मरु शकता, मृत्युमुखी पडू शकता, तुम्हाला काहीही होऊ शकते. अनिश्चित, पहा. येथे कोणतीही गोष्ट निश्चित नाही. परंतु तुम्ही त्यासाठी उत्कंठित आहात. ते काय आहे? ते तेथे वर आहे जे तुम्हाला त्यासाठी उत्कंठित करते.

83 आता, तुम्ही यामध्ये चालता, मग तुम्हाला अनंत जीवन मिळते. आता ते काय करते? हा विसार आहे.

कशावर ही विसाराची रक्कम काय आहे? जर मी तुमच्याकडे गाडी विकत घेण्यासाठी येतो, मी म्हणतो, "या गाडीचे किती पैसे?"

तुम्ही म्हणता, "भाऊ ब्रॅन्हम, या गाडीला, तुम्हाला तीन हजार डॉलर पडतील."

"आगाऊ रक्कम किती आहे?"

"बरे, मी तुम्हाला पाचशे डॉलरला ती घेऊ देईन."

"ठीक आहे, येथे पाचशे डॉलर आहेत. बाकीचे उरलेले मी तुला, जेवढे लवकर शक्य असेल, तेवढ्या लवकर देईन. गाडी तुम्ही धरा." मी तुला पाचशे डॉलर देतो. तो विसार आहे. ते बरोबर आहे का?

आता, ते धरुन ठेवा. तो विसार आहे, ती आगाऊ रक्कम आहे. नंतर ... तुम्ही अभिवचनाच्या आत्म्याद्वारे मुद्रित झालेले आहात, अभिवचनाच्या आत्म्याद्वारे, नंतर ... तुम्ही मुद्रित झालेले आहात....

जो [आत्म्याचा शिक्का काय आहे, अभिवचनाचा पवित्र आत्मा?] ... खंडणी भरुन मिळविलेल्या मुक्तीसाठी ... हा पवित्र आत्मा आपल्या वतनाचा विसार आहे....

84 तो काय आहे? ती आगाऊ रक्कम आहे. आणि, भावा, ओह, ओह, ओह! जर ही आगाऊ रक्कम आहे, जेव्हा आपण खरोखर [अस्पष्ट शब्द] ते काय असणार आहे? ते काय असणार आहे! जर हे.... जर हे, जो आपण आता आनंद घेतो आणि इतके खुश होतो की ... मी नव्वद वर्ष वयाच्या मनुष्यांना पाहिले आहे अगदी नाही....

मी वृद्ध प्रचारकाला एक रात्री पाहिले जो उभा राहिला. तो अशा प्रकारे बाहेर आला, व्यासपीठावर आला, आणि मी म्हणालो, "तो वृद्ध मनुष्य प्रचार करणार आहे?"

तो म्हणाला, "बरे, प्रभू धन्य असो!" एक वृद्ध निग्रो माणूस - भलाकाय मोठा, वृद्ध, लांब प्रचारकाचा झगा घातलेला.

आणि मी म्हणालो, "का त्यांनी त्यांच्यातील काही तरुण प्रचारकांना प्रचार करु दिला नाही? तो वृद्ध मनुष्य, कसा काय तो कधी प्रचार करु शकतो?"

तो म्हणाला, "बरे," तो म्हणाला, "भावांनो," तो म्हणाला, "आज मी भावांना संपूर्ण दिवस प्रचार करताना ऐकत आहे," तो म्हणाला, "येशूने पृथ्वीवर काय केले त्याबद्दल. मी त्याने स्वर्गात काय केले ते सांगणार आहे." तो म्हणाला, "आज रात्री मी माझा विषय ईयोब ७:२७ मधून घेईन," म्हणाला, "जेव्हा ते फार पूर्वी जगाच्या स्थापनेपूर्वी पलीकडे होते," म्हणाला, "जेव्हा तो म्हणाला प्रभात ताऱ्यांनी मिळून गायन केले व सर्व देवाच्या पुत्रांनी जयजयकार केला." तेव्हा ... अशा प्रकारे. म्हणाला, "तुम्हाला माहित आहे, काहीतरी तेथे मागे गेले." तो म्हणाला, "तुम्हाला माहित आहे...." आणि स्वर्गात काय घडले ते त्याने आणण्यास सुरुवात केली. त्याने दुसऱ्या आगमनामध्ये क्षितिजाला समांतर मेघधनुष्यामध्ये खाली आणले.

त्या वेळेपर्यंत, पवित्र आत्म्याने त्याला प्रहार केला. (आता, त्यांना त्या वृद्ध माणसाला तेथे आणावे लागले. तो सुमारे पंच्याण्णव वर्षाचा होता. तो अगदी अशा प्रकारे, पूर्णपणे वाकलेला होता, आणि फक्त केसांचे एक वलय, तुम्हाला माहित आहे, अशा प्रकारे होता.) तो तेथे बाहेर आला आणि त्याने प्रचाराला सुरुवात केली. तो म्हणाला, "व्हूपी! हालेलूया! गौरव!" अशा प्रकारे वर आणि खाली उड्या मारु लागला, म्हणाला, "ओह, मला येथे प्रचारासाठी तुमच्याकडे पुरेशी जागा नाही." आणि अशा प्रकारे एकाबाजूने दुसऱ्या बाजूपर्यंत संपूर्ण जमीन घेतली, अगदी जितक्या जलद तो जाऊ शकत होता. आणि तो अगदी विसार आहे. ओह!

85 पवित्र आत्मा काय करतो? ओह, तेथे चांगली जागा आहे. मला दुसऱ्या अध्यायातील पहिले पद वाचू द्या. मी वाचू शकतो? ते ठीक असेल का? म्हणा "आमेन." ठीक आहे, दुसऱ्या अध्यायातील पहिले पद, लगेचच. ऐका.

तुम्ही आपले अपराध व आपली पातके ह्यामुळे मृत झालेले होता त्याने आपल्याला सजीव केले....

"आपल्याला सजीव केले." सजीव केले म्हणजे काय? "जिवंत केले." अगदी जवळ जवळ गेलेले होतो, परंतु त्याने तुम्हाला सजीव केले, फक्त विसाराच्या पैशाद्वारे. काय होईल जेव्हा तुम्हाला खरोखर सर्व लाभांश मिळेल? ओह! आश्चर्य नाही पौल, तिसऱ्या स्वर्गापर्यंत उचलला गेला,

म्हणाला, "डोळ्याने पाहिले नाही, कानाने ऐकले नाही, माणसाच्या आले ... माणसाच्या हृदयात आले नाही, जे काही देवाने त्यांच्यासाठी, योजून ठेवले आहे, जे त्याला प्रेम करतात." ते काय असेल? तुम्ही अनिर्वाच्य आणि गौरवाने भरलेल्या आनंदाविषयी बोलता! व्हू! हम्म! तुम्ही जे एकदा अपराधामध्ये आणि पापात मृत होतात त्यांना त्याने एकत्र सजीव केले आहे, सावलीच्या सावलीच्या सावलीद्वारे. जेव्हा तुम्ही सावलीच्या सावलीच्या सावलीत येणार आहात, मग सावलीतून खाडीमध्ये, खाडीतून नदीमध्ये, नदीतून समुद्रामध्ये, तेव्हा काय असणार आहे?

86 आणि ते काय असेल जेव्हा तुम्ही उद्धारात असाल, अगदी नवीन शरीराबरोबर? तुम्ही सर्वस्व एका तरुण पुरुषामध्ये परत बदललेले असाल, किंवा एका तरुण स्त्रीमध्ये - तुम्ही परत कधीही मरणार नाही. आणि तुम्ही पृथ्वीवर खाली पाहाल, आणि विचार कराल, "मी काही द्राक्षाचा आणि अति चांगले थंडगार पाण्याचा आनंद घेऊ शकतो, परंतु, तुम्हाला माहिती आहे, येथे मला त्याची गरज नाही."

परंतु कधीतरी येशू येत आहे, आणि हे दिव्य शरीर, हे दैवी शरीर ज्यामध्ये मी वास करीत आहे, ते कधीही स्त्रीच्या गर्भाशयातून येणार नाही. ते कधीही समागमाच्या इच्छेतून येणार नाही. परंतु कारण की तो समागमाच्या इच्छेवाचून जन्मला, मी त्याशिवाय पुनरुत्थीत होईन. आणि तो कधीतरी बोलेल आणि ख्रिस्तामध्ये मेलेले उठतील, आणि शरीर ज्यामध्ये मी एकदा वास केला होता ते गौरवी शरीरात पुनरुत्थीत होईल, आणि मी चालेन, आणि मी बोलेन, आणि मी जगेन, आणि मी आनंद करीन. हालेलूया! [अस्पष्ट शब्द] येणाऱ्या युगांमध्ये, येशू ख्रिस्त आमच्या परमेश्वराद्वारे. तेथे तुम्ही आहात, भावांनो. ती सुवार्ता आहे.

87 "त्यामुळे मी सुद्धा...." पौल आता तो काय आहे ते अगदी सांगत आहे. (मी बाकीचे हे वाचतो आणि मग आपण आजाऱ्यांसाठी प्रार्थना करुया.) मुक्तीच्या दिवसापर्यंत, हा विसार आहे मुक्तीच्या दिवसापर्यंत, देवाच्या गौरवाची स्तुती व्हावी म्हणून.

त्यामुळे मी देखील, मी तुमच्या विश्वासाविषयी ऐकले [मी ऐकले की तुम्ही या गोष्टीवर विश्वास करता, मी ऐकले की तुम्ही खरोखर पूर्वनिर्धारितपणावर विश्वास करता, अनंत जीवनावर, आणि तारणावर, आणि इत्यादींवर] प्रभू येशूच्या ठायी, आणि सर्व संतजनावर ... प्रेम करता,

मी ही तुम्हासाठी आभार मानण्यात खंड पडू देत नाही, मी आपल्या प्रार्थनामध्ये तुमची आठवण करतो;

की आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याचा देव, जो वैभवशाली पिता, ह्याने तुम्हाला आपल्या ओळखी संबंधीच्या ... ज्ञानाचा व प्रकटीकरणाचा आत्मा द्यावा:

"...सर्वदा स्वतःला फक्त तुमच्यासाठी प्रकट करीत आहे, कृपेतून कृपेकडे वाढत आहे, सामर्थ्याकडून सामर्थ्याकडे, गौरवातून गौरवाकडे. मागे हटत नाही, परंतु गौरवातून गौरवाकडे - पुढे जात आहे. मी तुमच्यासाठी प्रार्थना करीत राहीन."

तुमचे अंतःचक्षू....

88 तुम्हाला माहित आहे, पवित्र शास्त्रामध्ये असे म्हटले जाते तुम्ही आंधळे होता आणि ते तुम्हाला ठाऊक ही नव्हते. परंतु येथे पौल म्हणाला, "मी प्रार्थना करणार आहे की तुमचे अंतःचक्षू...." तुम्ही तुमच्या हृदयाने समजता. तेच काय त्याबद्दल तो बोलत आहे. तुम्ही तुमच्या डोळ्यांनी पाहता; परंतु तुम्ही तुमच्या हृदयाने बघता. तुम्हाला ते ठाऊक आहे. ठीक आहे. "जेणेकरुन देवाचे गौरव...." पाहूया, अठरावे पद:

म्हणजे त्यामुळे तुमचे अंतःचक्षू प्रकाशित होऊन; त्याच्या पाचरणामुळे निर्माण होणारी आशा कोणती, पवित्रजनामध्ये त्याने दिलेल्या वतनाच्या वैभवाची ... समृद्धी केवढी,

आणि जे आपण विश्वास ठेवणारे, त्या आपणा विषयीच्या त्याच्या सामर्थ्याचे अपार महत्व ते काय [व्हिव! ते म्हणतात सामर्थ्य गेले? सामर्थ्य अजून आले देखील नाही.], हे तुम्ही त्याच्या बलशाही पराक्रमाच्या कृतीवरुन ओळखून घ्यावे,

[तुम्ही ज्यांनी त्याच्या पराक्रमाच्या कृतीवर विश्वास केला आहे, मी आताच प्रार्थना केली की देव त्याच्या सामर्थ्याचा तुम्हावर वर्षाव करील, पहा.]

त्याने तीच कृती ख्रिस्ताच्या ठायी दाखवून, त्याला मेलेल्यातून उठविले,

आणि सर्व ... सत्ता, ... अधिकार, ... सामर्थ्य, ... धनीपणा, सांप्रत आणि भावी युगातील कोणतेही नाव घ्या, त्या सर्वातून त्याला उंच करुन स्वर्गात आपल्या उजवीकडे बसविले,

ओह-ह-ह! कारण.... नाही, बरे होईल मी नाही. आपण नक्कीच त्यावर उरलेली रात्र घेऊ शकतो.

...प्रत्येक नाव जे दिले जाते, या जगामध्ये केवळ नाही, परंतु ... येणाऱ्या युगात....

89 काय प्रत्येक ... प्रत्येक नाव हे प्रत्येक व्यक्ती कसले नाव धारण करील? [मंडळी म्हणते "येशू."] अखंड स्वर्गाचे नाव येशू आहे, अखंड मंडळीचे नाव येशू आहे, सर्वकाहीचे नाव येशू आहे, कारण ते केवळ नाव आहे जे कधी देवाचे होते. त्याला यहोवा - यहोवा-यिरे म्हणण्यात आले, परमेश्वराचे प्रदान केलेले बलिदान; यहोवा-राफा, परमेश्वर जो तुला आरोग्य देतो; यहोवा, परमेश्वराचा झेंडा, मनसे; आणि यहोवा ... विभिन्न यहोवा. त्याला प्रभात तारा म्हणण्यात आले, त्याला पिता म्हणण्यात आले, त्याला पुत्र म्हणण्यात आले, त्याला पवित्र आत्मा म्हणण्यात आले, त्याला अल्फा म्हणण्यात आले, त्याला ओमेगा म्हणण्यात आले. त्याला आदी म्हणण्यात आले, त्याला अंत म्हणण्यात आले, त्याला शाखा म्हणण्यात आले. ओह, त्याला म्हणण्यात आले ... त्याला अगदी सर्व प्रकारच्या शीर्षकांनी संबोधण्यात आले; परंतु त्याला एक नाव होते.

तेच काय ते मत्तय ज्याबद्दल बोलत होता जेव्हा तो म्हणाला, "त्यामुळे तुम्ही जाऊन, सर्व राष्ट्रातील लोकांस शिष्य करा, त्यांना, पित्याच्या, पुत्राच्या, व पवित्र आत्म्याच्या नावाने [नावांनी नाही], बाप्तिस्मा द्या." पिता हे नाव नाही, पुत्र हे नाव नाही, पवित्र आत्मा हे नाव नाही. ती नावाची शीर्षके आहेत. ते नाव आहे तीन गुणांचे जे एका देवाच्या मालकीचे आहे. त्याचे नाव काय होते? दूत म्हणाला, "तू त्याचे नाव [मंडळी म्हणते "येशू"] ठेवशील कारण तो त्याच्या लोकांना त्यांच्या पापापासून तारील. त्यामुळेच त्या सर्वांनी त्या मार्गाने बाप्तिस्मा घेतला पवित्र शास्त्रात. तसाच जसा संत अगस्टीनने इंग्लंडच्या राजाला सुमारे दीडशे वर्षाने, दोनशे वर्षानंतर ख्रिस्ताच्या मरणानंतर - येशू ख्रिस्ताच्या नावात बाप्तिस्मा दिला. ठीक आहे.

90 सर्व ... सत्ता, ... अधिकार, ... सामर्थ्य, ... धनीपणा, सांप्रत आणि भावी युगातील, कोणतेही नाव घ्या, त्या सर्वाहून त्याला उंच करुन स्वर्गात आपल्या उजवीकडे बसविले:

त्याने सर्वकाही त्याच्या पायाखाली ठेवले, आणि त्याने सर्वावर मस्तक असे व्हावे म्हणून त्यास मंडळीला दिले,

हीच त्याचे शरीर....

आता, जर माझ्या शरीराला सर्व गोष्टीवर सामर्थ्य असेल, मग जे काही माझे शरीर असेल तोच मी आहे. ते बरोबर आहे? तोच काय तो मी आहे. तेच काय ते तुम्ही मला तसा ओळखता. ते बरोबर आहे? बरे, मग, सर्वकाही जे देव होता, त्याने ते येशूमध्ये ओतले, कारण तो देवपणाची पूर्णता होता. ते बरोबर आहे? आणि ते सर्वकाही जे येशू होता, त्याने ते मंडळीत ओतले: "जी कृत्ये मी करतो, तुम्ही देखील कराल. अगदी त्यापेक्षा मोठी तुम्ही कराल, कारण मी पित्याकडे जातो."

हीच त्याचे शरीर, जो सर्वांनी सर्वकाही भरतो त्याने ती भरलेली आहे.

91 ओह, कसे मला ते आवडते. कसे मला ते आवडते. त्या दिवशी मी पुस्तक वाचित होतो जे आफ्रिकेतील दौऱ्याविषयी ... जेव्हा मी सेवेसाठी गेलो होतो त्याबद्दल लिहिले होते. ते अगोदर कधी वाचले नव्हते. किती जणांनी 'संदेष्टा आफ्रिकेला भेट देतो' पुस्तक कधी वाचले आहे? त्यामध्ये मी लहान भारतीय मुलाकडे पाहत होतो. किती जणांनी ते चित्र पाहिले आहे?

मी ऐकले कोणी एक सुवार्तिक, सुमारे पंधरा वर्ष किंवा अधिक काळापासून आजाऱ्यांसाठी प्रार्थना करीत आहे, तो म्हणाला, "मी माझ्या जीवनात कधी चमत्कार झालेला पाहिला नाही." तो म्हणाला, "मी लोकांना पाहिले आहे जे म्हणाले त्यांची डोकेदुखी बरी झाली आहे. मी लोकांना पाहिले आहे असे म्हणताना की त्यांची पोटदुखी बरी झाली आहे, आणि इत्यादी. परंतु एक चमत्कार, काहीतरी जे निर्माण झाले आणि काहीतरी तयार...."

मी विचार केला, त्या मुलाने तेथे उभे राहून ते पाहायला हवे होते. त्या भारतीय मुलाचा पाय अगदी एवढा मोठा होता. त्यातील एक. दुसरा पाय सामान्य होता, जसा मनुष्याचा पाय असतो. आणि जर तुम्ही त्याच्या ब्रेसकडे पाहिले असते, तेथे त्याचा बूट होता जो सुमारे चौदा इंच किंवा पंधरा इंच उंच होता, अशा प्रकारे. त्याच्या तळव्याखाली लोखंडाची चकती होती. त्याचा बूट दोन सरळ सळ्यावर ज्या उभ्या होत्या त्यावर ठेवलेला होता. तो जेथे मी उभा होतो तेथे चालत आला. त्यांनी त्याला तेथे आणले. त्याच्याकडे दोन कुबड्या होत्या. त्याने त्याचा मोठा लोखंडाचा बूट घेतला आणि अशा प्रकारे आवाज करीत खाली ठेवला. मी त्याच्या पायाकडे पाहिले. तो सभोवती एवढा मोठा होता.

92 आता, ते लोक मुसलमान आहेत. तुम्हाला लक्षात आहे गेल्या रविवारी जेव्हा मी तुम्हाला वाचून दाखविले वर्तमान पत्राला काय लिहावयाचे होते? सरळ आता ते माझ्या स्वतःकडे आहे, आफ्रिकेमधून, भाऊ स्ट्रीकर, परत आलेल्या धर्मप्रसारकाद्वारे मला पाठविले गेले. तेथे लेख आहे कसा बिली ग्रॅहम त्यापासून पाठी हटला (ते तंतोतंत आहे) आणि मुसलमानांना त्याने त्याला सरळ समुद्रात ढकलू दिले. काय बाब आहे? धर्मप्रसारक कार्य क्षेत्र सोडीत आहेत. अजून जास्त काळ राहण्याचा काय उपयोग? ते अगदी हरले.

मी बिली ग्रॅहमला प्रेम करतो. मी विचार करतो तो देवाचा अद्भुत मनुष्य आहे. परंतु बिली ग्रॅहमने काय बोलून, त्याला गप्प करायला हवे होते, "एक मिनिट थांब...." जर यातील काही स्वयं ताठर बॅप्टिस्टने ते त्याला करु दिले असते, मी विश्वास करतो त्याने ते केले असते. मी विश्वास करतो बिली ग्रॅहम देवाचा माणूस आहे. परंतु जर तो असे म्हणाला असता, "एक मिनिट थांब. मी सुवार्तेचा सेवक आहे. तू जुन्या करारावर विश्वास करतो, आणि तू म्हणालास की येशू काही नाही परंतु माणूस होता. मी तुला वाद विवादाचे आव्हान करतो."

मी सैतानाची आव्हाने घेण्यामध्ये विश्वास करीत नाही, नाही महाशय, परंतु मी त्याला परत आव्हान केले असते, आणि म्हणालो असतो, "मी आणि तू एकत्र येऊया. मी दैवत्वाचा डॉक्टर आहे [बिली ग्रॅहम दैवत्वाचा डॉक्टर आहे]. मला तुला यावर आव्हान करु दे, आणि मला तुला सिद्ध करु दे की येशू हा ख्रिस्त होता. आता, जेव्हा दैवी आरोग्याची वेळ येते, ती वरदाने नाहीत माझ्याकडे; परंतु आमच्याकडे काही भाऊ आहेत ज्यांच्याकडे आहेत. आता, जर तुला त्या लोकांना तेथे बाहेर आणायचे असेल, मला त्यातील फक्त एकाला बोलावू दे, ओरल रॉबर्ट्स किंवा कोणीतरी." - कोणीतरी ज्याच्याकडे मोठी सेवा असेल जो खरोखर तेथे जाईल. येथे ये, आणि मग पहा काय ... घडते. म्हण, "ख्रिस्तीपण ते नाही जे तू विचार करतोस ते आहे."

93 आता सर्वांचा हिरमोड झाला कारण तो सरळ चालता झाला आणि त्याला सोडले. अर्थात, आता, मी विश्वास करीत नाही की सैतान तुम्हाला आव्हान करतो. मी त्याच्या तोंडावर थुंकून, देखील, अशा प्रकारे, त्याच्यापासून निघून आलो आहे. ते बरोबर आहे. परंतु जेव्हा असे स्थान येते जेथे.... बिलीने त्या मुसलमानाला लहानशा तणासारखे वाटायला लावले असते, अशा प्रकारे. त्याने ते पवित्र शास्त्र घेतले असते आणि यशया ९:६ घेऊन, म्हणाला असता, "तो हे कोणाबद्दल बोलत होता, 'आम्हासाठी बाळ जन्मला आहे, आम्हाला पुत्र दिला गेला आहे'? हा मनुष्य कोण

होता? हा कोण होता ज्याबद्दल हा बोलत होता? हा संदेष्टा कोण होता? हा मसीहा कोण होता जो येणार होता? मला दाखव त्याने स्वतःला कुठे मोहम्मदमध्ये दर्शविले.

"तो आमच्या अपराधांसाठी घायाळ झाला, आमच्या दुष्कर्मांमुळे ठेचला गेला, आम्हाला शांती मिळावी अशी त्याला शिक्षा झाली, आणि त्याला बसलेल्या फटक्यांनी आम्हाला आरोग्य प्राप्त झाले आहे.' मला हे मोहम्मदमध्ये दाखव. कसा तो रडला, 'माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केला? त्यांनी माझे हात आणि माझे पाय विंधिले आहेत,' आणि इत्यादी? तुझ्या स्वतःच्या वचनाने, तुझ्या स्वतःच्या कराराने मला ते दाखव." का, त्याने त्या मुसलमानाचा वाईट रीतीने पराभव केला असता की त्याला कळले असते की तो कुठे होता. ते बरोबर आहे.

94 परंतु जेव्हा वर्तमान पत्राला वळावे लागले, तेच काय ते दुखविते, काय माझ्या हृदयाला उंचबळविते. जेव्हा तेथे म्हणाले, "जरी बिलीला मागे फिरावे लागले आणि तो मागे फिरला, कसे काय मुसलमान म्हणू शकतात की ते चुकीचे होते? म्हणाले, "जेव्हा आदरणीय विल्यम ब्रॅन्हम दरबनमध्ये, साऊथ आफ्रिकेत होते, निर्विवाद चमत्कारा मागून चमत्कार, दैवी सामर्थ्याने, जेव्हा दहा हजार मुसलमान त्यांच्या मुखावर उपडे पडले एक वेळेस आणि त्यांचे जीवन येशू ख्रिस्ताला दिले." निखालस. त्यांना त्याबद्दल ठाऊक आहे. त्या सनातनी लोकांना त्याबद्दल ठाऊक आहे. मला तुम्ही सांगू नका.

एका वेळेस तेथे एकजण येशूकडे आला, म्हणाला, "गुरुजी." (तुम्हाला ठाऊक आहे, तो एक परुशी होता.) तो म्हणाला, "आम्हाला ठाऊक आहे तुम्ही देवाकडून आलेले शिक्षक आहात. आम्हाला ते ठाऊक आहे. आम्हाला ते ठाऊक आहे, कारण जी कृत्ये तुम्ही करता ती देव बरोबर असल्यावाचून कोणी करु शकत नाही. आम्ही समजतो. आम्हाला ते ठाऊक आहे, परंतु आम्ही सहज ते कबूल करु शकत नाही, पहा, कारण जर आम्ही केले, बरे, आम्हाला आमच्या मंडळीतून बाहेर काढले जाईल. पहा, आम्ही आमचा लौकिक गमावू." आणि तेव्हा येशू म्हणाला ... त्याला सांगण्यास सुरुवात केली त्याला नव्याने जन्म घेणे आहे.

95 त्या मुसलमान मुलावर, जेव्हा तो तेथे उभा होता.... तेथे त्याचे चित्र आहे; कॅमेरा खोटे घेत नाही. तेथे तो उभा आहे, एक पाय तेवढा तोकडा (सुमारे चौदा इंच) दुसऱ्या पेक्षा, त्या लोखंडी बुटावर उभा होता. त्याला म्हणाले, मी म्हणालो, "तू इंग्लिश बोलतोस का?"

"नाही, महाशय." इंग्लिश बोलू शकत नव्हता. अनुवाद करणारा म्हणाला, "तो इंग्लिश बोलत नाही."

"किती काळ तू अशा प्रकारे आहेस?" अनुवादकाने त्याला विचारले.

"जन्मापासून."

"तू पाय अजिबात हलवू शकतो?"

"नाही, महाशय."

"तू येशू ख्रिस्तामध्ये विश्वास करतोस?"

तो म्हणाला, "मी मुसलमान आहे."

मी म्हणालो, "जर त्याने तुला बरे केले तू येशू ख्रिस्ताला स्वीकारशील?"

"मी येशू ख्रिस्ताला माझा तारणारा म्हणून स्वीकारीन जर त्याने मला बरे केले."

"जर त्याने ते बरे केले, तो पाय दुसऱ्या सारखा झाला, तू त्याला स्वीकारशील?"

"मी स्वीकारीन."

96 "हे देवा, तू काय करशील?" ही पुढची गोष्ट आहे. सर्व प्रश्नांची उत्तरे मिळाली. भाऊ माईक, त्याला अनुभवायचे होते. मी अगदी मिनिटभर थांबलो हे पाहण्यासाठी की तो काय सांगण्यास जात होता. मी सभोवती पाहिले, मुलाला जाताना, चालताना, भिंतीच्या बाजूने अशा प्रकारे पाहिले.

मी म्हणालो, "तुम्हातील किती मुसलमान त्याला स्वीकारतील? येथे मुसलमान मुलगा आहे. त्याच्याकडे पाहिले, तेथे तो उभा होता." मी म्हणालो, "तुम्ही डॉक्टर, तुम्हाला त्याच्याकडे पाहायचे आहे? तेथे तो उभा आहे." ओह, तुम्हाला ठाऊक असते तेव्हा तुम्ही कोठे आहात. पहा, तुम्हाला माहिती असते तुम्ही कोठे उभे आहात. कोणीही नाही ... तेथे तो होता.

मी म्हणालो, "मुला, या मार्गाने पलीकडे चाल." आणि त्यांनी त्याला आणले. येथे तो आला, ता-लोम्प्, ता-लोम्प्. मी म्हणालो, असे दिसते सुमारे बारा, चौदा इंच तोकडा आहे. सुमारे अशाप्रकारे."

"होय."

मी म्हणालो, "परंतु येशू ख्रिस्त देवाचा पुत्र त्याला बरे करु शकतो. तुम्ही मुसलमान ते विश्वास कराल आणि त्याला व्यक्तिगत तारणारा म्हणून स्वीकाराल?"

तेथे हजारो काळे हात अशाप्रकारे वर गेले. "बरे, प्रभू, आता समय आहे." मी म्हणालो, "स्वर्गीय पित्या, जर तू कधी उत्तर दिले असेल,

आता मला उत्तर दे. हे तुझ्या गौरवासाठी आहे. हे तुझ्यासाठी आहे. मी प्रार्थना करतो तू या मुलाला बरे कर." मी फक्त अशा प्रकारे त्याच्यावर प्रार्थना केली.

मी म्हणालो, "तुझा बूट काढ." त्याने, अनुवादकाने, माझ्याकडे खरोखर विचित्रपणे पाहिले. मी म्हणालो, "तुझा बूट काढ." त्याने त्याचे बंध सोडले. (कारण मी तो दृष्टांत पाहिला होता, की काय घडणार होते.) त्याने ती गोष्ट काढून टाकली. जेव्हा त्याने ती पाठी घेतली, तेथे माझ्याकडे चालत आला, दोन्ही पाय अगदी सामान्य होते अगदी जसे आता मी चालतो. मी म्हणालो, "तुला मागे पुढे चालायचे आहे?"

तो रडू लागला, अशा प्रकारे, मागे पुढे गेला, त्याला कळत नव्हते काय करावे. अशा प्रकारे चालत होता, तो म्हणाला, "हे अल्ला! अल्ला!"

मी म्हणालो, "येशू, येशू."

ओह, "हे येशू, येशू," मग. "येशू! येशू!" अशा प्रकारे.

मी म्हणालो, "तेथे कोणता प्रश्न आहे का, कोणता प्रश्न?"

97 ज्युलिअस स्टॅडस्क्लेव, किती जणांना तो माहित आहे? भाऊ स्टॅडस्क्लेव, येथे मंडळीत आला होता. तो आताच जर्मनीला गेला. म्हणाला, "अगदी एक मिनिट, भाऊ ब्रॅन्हम. अगदी एक मिनिट छायाचित्रकाराला बाहेर आणले. मी त्याचे चित्र घेऊ शकतो का?"

मी म्हणालो, "जे तुला वाटेल ते कर."

तेथे चालत गेला. त्याने त्याचा बूट येथे उभा केला. तो अशा प्रकारे उभा राहिला, त्या मुलाचे छायाचित्र घेतले. तेथे दोन्ही पाय इतके सामान्य आणि सरळ होते जेवढे असायला हवेत; तेथे त्याचा जुना बूट आणि ब्रेस अशा प्रकारे उभे होते.

मी म्हणालो, "तुम्हांपैकी किती मुसलमान आता मोहम्मदला संदेष्टा म्हणून नाकाराल, आणि येशूला देवाचा पुत्र म्हणून विश्वास कराल, आणि त्याला तुमचा वैयक्तिक तारणारा म्हणून स्वीकाराल?" हवेमध्ये दहा हजार हात वर गेले. हालेलूया! त्यांना नको आहे....

98 ते त्याला मागे ठेवण्याचा प्रयत्न करतात, कारण आपण "पवित्र लोळणारे" आहोत, ते आपल्याला संबोधतात, तुम्ही पहा. अगदी सारखेच, देव पुढे जात आहे, त्याची मंडळी स्थानापन्न करीत आहे. तो "अधिक्याने आणि विपुलतेने" करीत आहे त्या सर्वाहून वर जे काही कधी आपण करु किंवा विचार करु. तो तेवढाच देव आज रात्री आहे जेवढा तो कधी होता.

तेव्हा, लहान मित्रांनो, आताच मला तुम्हाला काहीतरी सांगू द्या. माझ्या प्रिय मौल्यवान लोकांनो - तुम्ही येथे जे या भूमीत आहात, आणि दुसरे जे ध्वनिमुद्रणपट्ट्याच्या भूमीत आहात, जे परदेशात असतील आणि जेथे कोठे तुम्ही आहात - भिऊ नका. सर्वकाही ठीक आहे. देव पित्याला, जगाच्या स्थापनेपूर्वी, सर्वकाही ठाऊक होते जे घडणार होते. सर्वकाही योग्य रीतीने घडते. तुम्ही त्याला प्रेम करता? तुमचे हृदय योग्य ठेवा.

99 आणि, लक्षात ठेवा, जेव्हा या जीवनातून हा श्वास निघून जाईल, तुम्ही वृद्ध लोक किंवा तुम्ही तरुण लोक, आणि तुम्ही मातांनो, जेव्हा तुम्ही तुमच्या लहान बाळांना पाहाल... ती लहान मुलगी जी मेली जेव्हा ती आठ दिवसाची देखील नव्हती, किंवा पाच दिवसाची, जेव्हा तुम्ही तिला पाहाल ती सुंदर तरुण स्त्री असेल. तो वृद्ध आजोबा जो पूर्णपणे वाकलेला अगदी महत्प्रयासाने पाहू ही शकत नव्हता तो कुठे जात होता, जेव्हा तुम्ही त्याला पाहाल, आजी, तो सुंदर देखणा तरुण पुरुष असेल, अगदी तेवढा तरुण, सुमारे वीस वर्ष वयाचा, अगदी तारुण्याच्या सौंदर्यात. आणि तो सर्वकाळासाठी तसा असेल.

तुम्ही त्याच्या हाताला स्पर्श करु शकता, तुम्ही त्याला हस्तांदोलन करु शकता. तुम्ही त्याला आलिंगन देऊ शकता, परंतु तो पती नसेल; तो भाऊ असेल. ओह, माझ्या! तो पतीपेक्षा फार अधिक असेल. तुम्ही विचार करता तुम्ही त्याला प्रेम केले? तुम्ही निश्चित केले. परंतु ते फिलिओ शारीरिक होते; तुम्हाला आगापे मिळेपर्यंत थांबा. ते वास्तविक दैवी प्रेम पकडेपर्यंत थांबा, आणि मग पहा ते काय आहे. येथे हे जसे काही कचऱ्याचा ढीग धुसण्यासारखे आहे. ते चांगले नाही, तेथे त्यामध्ये काही नाही. केवळ एक गोष्ट मी तुम्हाला करण्याचा सल्ला देतो आता ती ही, माझ्या मित्रा....

100 थोड्या वेळानंतर मी.... कधीतरी ते दुसरे दोन अध्याय माझ्यासाठी घ्यावे अशी तुमची इच्छा आहे काय? परमेश्वर.... चटाक्काला जाण्याअगोदर मला अगदी थोडासा आराम करायचा आहे. आता, मी या गोष्टी त्या सभांमध्ये प्रचार करु शकत नाही. तेथे खूप अधिक ... कित्येक वेगवेगळे विश्वास असतात, पहा. ही केवळ फक्त मंडळी आहे, पहा. मी प्रचार करु शकत नाही.... येथे मला जे काही हवे ते मला प्रचार करण्याचा अधिकार आहे. हे माझे प्रार्थनामंदिर आहे, पहा, आणि मी तुम्हाला सांगत आहे.

आता, मी विश्वास करतो लोकांचे तारण झाले आहे. होय, महाशय, मी खरोखर तो विश्वास करतो. परंतु, ओह, जेव्हा तुम्हाला माहित असते तुम्ही कोठे चालत आहात ते किती अधिक चालणे असते. ते किती अधिक समजणे असते तुम्ही काय करीत आहात, पहा, डळमळण्याऐवजी, अडखळण्याऐवजी. अगदी सरळ प्रकाशात उभे राहूया, आणि प्रकाशात चालूया आणि समजूया आपण कोणत्या मार्गाकडे जात आहोत. ते खरे आहे. परमेश्वर तुम्हाबरोबर असो.

101 आणि जर तुम्हातील प्रत्येक जण जो येथे आहे आता योग्य पदावर स्थानापन्न नसेल.... तुम्ही काही नाही परंतु एक गृहिणी असाल. बरे,

तुम्ही म्हणाल, “भाऊ ब्रॅन्हम, माझ्या जीवनात मी कधीही एक गोष्ट केली नाही. मी प्रचारक नाही.” बरे, कदाचित देवाने येथे तुला मुलांचे कुटुंब उभारण्यासाठी आणले असेल. त्या मुलांच्या कुटुंबातून कदाचित दुसरे मुलांचे कुटुंब येईल, तो कदाचित प्रचारक असेल जो दशलक्ष प्राणांना ख्रिस्ताकडे पाठविल. तुम्ही येथे असायलाच हवे. तुम्ही येथे उद्देशाखातर आहात. तुम्हाला ते माहित आहे?

बरे, तुम्ही म्हणता, “मी कधी काही केले असेल तर या जुन्या ढेकळांच्या पलीकडे नांगरले आहे. आणि मी प्रत्येक संध्याकाळ बाहेर काढली आहे, माहिती देखील नव्हते की मी मुलांचे पालन पोषण कसे करणार. मी गरीब बिचाऱ्या लहान मुलांना विना बुटामध्ये पाहिले. मी बसून, रडलो आहे. माझी जुनी गाडी आहे, आणि मी आणि आई प्रार्थना मंदिरात गेलो.” भावा, तू काळजी करु नको. तू फक्त त्याच्यावर प्रेम करत रहा. तुझ्यासाठी त्याचा उद्देश आहे. तू जसा आहेस अगदी त्याप्रमाणे रहा. फक्त पुढे जात रहा, पहा. कदाचित तू कधीही एक उपदेश प्रचार करणार नाहीस, परंतु तू कदाचित जो प्रचार करील त्याचा पणजोबा असशील.

102 तुम्हाला माहित आहे की देवाने (आता पाहूया, त्याचे नाव काय होते? लेवीच्या खाती, दशमांश जमा केला जेव्हा तो अब्राहमामध्ये बीजरुपाने होता, जेव्हा मलकीसदेक त्याला भेटला? किती जणांना ते माहित आहे? आणि पाहूया. अब्राहामाने इसहाकाला जन्म दिला, इसहाकाने याकोबाला जन्म दिला, याकोबाने लेवीला जन्म दिला - जो पिता, आजोबा, पणजोबा होता. जेव्हा तो बीजरुपाने होता, त्याच्या पणजोबाच्या बीजामध्ये, पवित्रशास्त्राने मलकीसदेकला दशमांश देणे त्याच्या खाती मांडले. माझ्या, माझ्या, माझ्या, माझ्या, भावा! ओह, मी ...

103 तेथे लहानसा इंग्लिश माणसाचे एके रात्री इंग्लंडमध्ये परिवर्तन झाले, तो म्हणाला, “मी फार आनंदी आहे! मी फार आनंदी आहे!”

होय, इतका आनंदी हे समजण्यामुळे की हे सत्य आहे! आणि कोण्या गौरवी दिवशी.... मला ठाऊक नाही तो दिवस कधी असेल, परंतु जर तो दृष्टांत असेल, मी असे म्हणत नाही मी येथे होतो. लक्षात ठेवा, हे नेहमी ध्यानात ठेवा (ध्वनिमुद्रणपट्ट्या घेणारे ही तसेच करा.), मी दृष्टांतात होतो, किंवा आत्म्यामध्ये उचलले गेलो, मला ठाऊक नाही. परंतु ते अगदी इतके वास्तविक होते जसे मी माझा भाऊ नेविलला अशा प्रकारे हाताने धरले आहे, अगदी इतके वास्तविक. आणि मी पाहू शकत होतो आणि त्या लोकांशी बोलू शकत होतो. आणि तेथे माझी पहिली पत्नी उभी होती. तिने आरोळी मारली नाही, “माझ्या पती!”; ती म्हणाली, “माझ्या प्रिय भावा.”

104 तेथे एक मुलगी उभी होती जिच्याबरोबर काही वर्षाअगोदर मी जात असे. कदाचित तिचे काही लोक येथे बसलेले असतील - युटिकातील ॲलिस लेविस, फार चांगली, निष्ठावान, ख्रिस्ती मुलगी होती. खूप उशिरा जीवनात लग्न झाले, आणि त्यांना पहिले बाळ झाले, आणि बाळाला जन्म देताना मृत्यू पावली. ॲलिस लेविस. मी दफनच्या घरात तिला पाहण्यासाठी आत गेलो. मी आताच घरी आलो होतो, मी ऐकले ती मेली. मी तेथे खाली गेलो, तेथे खोलीत कोणी नव्हते. मी म्हणालो, “येथे स्त्री आहे का, मिसेस....” तिचे नाव इमरकी होते. तिने एका चांगल्या ख्रिस्ती मुलाबरोबर लग्न केले होते, आणि ती एक चांगली ख्रिस्ती मुलगी होती.

मी त्या मुलीबरोबर सर्वत्र असे, सर्व प्रकारच्या स्थळावर आणि सर्वकाही. आणि अगदी लहान, अठरा, एकोणीस वर्ष वयाचा होतो. सर्वत्र. चांगली ख्रिस्ती. तिच्याबद्दल अस्सल ख्रिस्तीपण सोडून काही ठाऊक नव्हते. आणि मी पापी होतो; परंतु मी तिच्याबरोबर जात असे. मी आत गेलो.... आणि तिचा पती, एक नवीन जन्म पावलेला ख्रिस्ती, वास्तविक मनुष्य. आणि मला ठाऊक नव्हते.... मला ठाऊक होते ती मेली होती. मी वर्तमानपत्रात पाहिले होते, आणि मी खाली गेलो. त्यांनी मला सांगितले. मी तेथे कूट्सकडे गेलो, आणि मी म्हणालो, “तुमच्याकडे मिसेस इमरकी आहे का?”

तो म्हणाला, “बिली, ती अगदी तेथे खोलीत आहे.”

मी तेथे आत गेलो आणि तेथे शवपेटीच्या शेजारी उभा राहिलो. मी विचार केला, “ॲलिस, मी अंधाऱ्या कोठरीत होतो, मी अंधाऱ्या मार्गावर होतो. तू आणि मी मार्गावरुन एकत्र चाललो आहोत आणि नदीच्या पलीकडे. जेव्हा त्यांच्याकडे जुन्या शो बोट असत, आम्ही बसून, ते कॅलिओप नाटक ऐकत असू. मार्गाच्या वर आणि खाली. तू किती चांगली महिला होतीस! तुझ्या जीवनासाठी कसा मी देवाला धन्यवाद देतो. विसावा घे, माझ्या प्रिय बहिणी, देवाच्या शांतीमध्ये विसावा घे.”

105 आणि त्या रात्री दृष्टांतात, तेथे ती धावत माझ्याकडे आली. ती म्हणाली, “माझ्या आशीर्वादित भावा,” आणि तिचे बाहू माझ्या सभोवती टाकले. ओह, भावा, बहिणी, त्याने मला बदलले. मी यापुढे कधीही तसाच राहू शकत नाही. ते इतके वास्तविक आहे. ते अगदी तितके वास्तविक आहे जसे आता मी तुम्हाकडे पाहत आहे, अगदी तितके वास्तविक. तेव्हा, तेथे भीती नाही.

मी कदाचित रात्र संपण्यापूर्वी मरेन. मला माझ्या लहान मुलाला, जोसेफ, मागे तेथे त्याला वाढवायचे आहे. मला त्याला उपदेशमंचावर पाहायचे आहे. जेव्हा मी हे पवित्रशास्त्र घेऊ शकेन, जेव्हा मी अशा जागेवर येईन जेथे मी जोसेफला तरुण पुरुष म्हणून उपदेशमंचावर प्रचार करताना पाहीन पवित्र आत्म्याने भरलेला, देवाच्या आत्म्याचा अभिषेक त्याच्यावर.... आणि मी विश्वास करतो तो संदेष्टा असेल. त्या दिवशी जेव्हा मी त्याला सहा वर्षांपूर्वी पाहिले तो जन्मण्यापूर्वी, तुम्हाला लक्षात आहे मी तुम्हाला सांगत होतो तो येत होता. लक्षात आहे जेव्हा मी त्याला अगदी तेथे वेदीच्या बाजूला बोलावले, माहित नव्हते मी काय बोलत होतो, बाळांना समर्पित करीत होतो, मी म्हणालो, “जोसेफ, तू संदेष्टा आहेस.”

106 त्या दिवशी अंगणात उभा असताना, तो माझ्याकडे आला, आणि तो म्हणाला, “डॅडी, येशूकडे तुमच्यासारखे हात आहेत का?”

आणि मी म्हणालो, “बरे, होय, मुला. का?”

तो म्हणाला, “मी माझ्या सायकलीवर बसलेलो होतो, साराला [ती त्याची लहान बहीण आहे] शाळेतून घरी येत असताना पाहत होतो.” तेथे बाहेर बसलेलो होतो. मी त्याला बाहेर रस्त्यावर जाऊ देत नाही; तो अशा प्रकारे मागे बसलेला होता. आणि म्हणाला, “मी वर पाहिले.” आणि

म्हणाला, "जेव्हा मी पाहिले, तेथे तुमच्या हातासारखा, पांढरा बाहू, माझ्यावर पकडलेला होता." आणि म्हणाला, "तो वर गेला." म्हणाला, "तो येशूचा हात होता का जो वर गेला?" मी आईकडे पाहिले; आईने माझ्याकडे पाहिले. आम्ही मिसेस वूड्सकडे गेलो. (जेथे कोठे ती, येथे बसलेली आहे.) आम्ही त्याची उलट तपासणी केली, मागे आणि पुढे, आणि सर्व बाजूने जशी आम्ही करु शकत होतो. तो दृष्टांत होता. त्याने तो पाहिला. जेव्हा मी तो समय त्या लहान जोसेफला उभे राहिलेले पाहू शकतो.... मी आशा करतो मी त्याला लग्न झालेले पाहण्यासाठी जगेन, जर येशू येण्यास थांबला.

107 आणि मी एक वृद्ध मनुष्य आहे, माझ्या मानेभोवती येथे पांढरे केस लोंबकळत आहेत. जर शक्य असेल तर मला दोन किंवा तीन अधिक दशलक्ष प्राणांना ख्रिस्ताकडे पाठवायचे आहे. प्रत्येक पृथ्वीच्या कोपऱ्यामध्ये सुवार्ता प्रचार करायची हे माझे ध्येय आहे. होय, महाशय. तेव्हा देवा मला साहाय्य कर, मी ते करीन. तेव्हा, जेव्हा तो समय आलेला मी पाहू शकेन, भाऊ माईक....

मी समयाकडे पाहू शकतो आई (मेडा, मी तिला, माझी प्रिय, म्हणतो), पहा ती ... आम्ही वृद्ध होत आहोत. पहा तिचे केस पांढरे होत आहेत, आणि पहा आम्ही दूर जात आहोत, लुप्त होत आहोत.

रिबेका, मी रिबेकाकरिता फार कृतज्ञ आहे. तिच्या संगीत शिक्षिकेने त्या रात्री मला सांगितले, म्हणाली, "माझ्या, जर ती अशा प्रकारे पुढे गेली, भाऊ ब्रॅन्हम," म्हणाले, "ते सांगणे कठीण आहे ती काय करील." पहा, संगीतात पुढे जात आहे. मला ती आणि ... मला सारा ऑर्गनवर, आणि बेकी पियानोवर हवी आहे, मला जोसेफ उपदेशमंचावर हवा आहे.

108 जेव्हा ते मी घडताना पाहीन, आणि मी व आई डळमळताना, मी माझ्या जुन्या काठीवर, कोणत्या रात्री, रस्त्यावर खाली येईन; आणि मी तेथे पाहू शकेन आणि माझ्या मुलाला पवित्र आत्म्याने अभिषिक्त असा उभा राहिलेला पाहीन, हीच सुवार्ता प्रचार करीत असलेला, मी हे जुने पुस्तक घेऊन, म्हणेन, "मुला, येथे हे आहे, हे तुझे आहे. तू याबरोबर उभा रहा, एका शब्दावर देखील तू तडजोड करु नको. प्रिय, तू अगदी याबरोबर रहा. तू नको.... मी पर्वा करीत नाही तुझ्या विरुद्ध कोण आहे, देव तुझ्याबरोबर असेल. तू प्रत्येक वचन अगदी जसे येथे लिहिले आहे तसे प्रचार कर, आणि डॅडी तुला नदीपलीकडे पाहतील." मला सभोवती जाऊन, माझ्या पत्नीला, माझ्या बाहुत घेऊन, यार्देने पलीकडे ओलांडायचे आहे.

त्या समयापर्यंत, देवा, मला निष्ठेने, कार्यक्षेत्रावर राहू दे. मला ... मी पर्वा करीत नाही किंमत काय आहे, किंवा किती, मी काय करतो, किंवा हे, ते किंवा इतर, मला जिवंत देवाच्या वचनाशी निष्ठेने आणि सत्यतेने राहू दे, की जेव्हा तो दिवस येईल मी तेथे ओलांडेन, आणि मी पलीकडे पाहीन आणि म्हणेन, "तेथे तू आहेस." ओह, माझ्या मौल्यवान मित्रा, माझ्या मौल्यवान भावा, माझ्या मौल्यवान बहिणी.

109 तरुण प्रचारका, कार्यक्षेत्रात जा, लगामामध्ये रहा. सर्व तुम्ही तरुण प्रचारक आणि गोष्टी, तुम्ही सभोवती बसू नका. तुम्ही केवळ काही न करता बसू नका. बाहेर निघा आणि प्राण जिंका. काहीतरी करा! पुढे जा, हालचाल करा. थांबू नका, तेथे तरुण प्रचारकांनो. देव तुमचे हृदय आशीर्वादित करो.

तो मला जेव्हा मी सुमारे त्या वयाचा होतो त्याची आठवण करुन देतो, मी अंदाज करतो, किंवा कदाचित लहानसा त्याच्यापेक्षा थोडासा. मी केवळ सुमारे वीस काहीतरी वर्ष वयाचा होतो जेव्हा मी तेथे कोनशिला घातली. मी लक्षात करतो मी निळा कोट आणि सफेद विजार घालीत असे, आणि तेथे उभा राहिलो आणि सुमारे एकतीस वर्षाअगोदर तेथे कोनशिला घातली. पहा मी किती वर्षाचा होतो - मी अगदी मुलगा होतो. मी तेथे उभा होतो, ती कोनशिला घालीत होतो. मी एकाही वचनावर तडजोड केली नाही. मी अगदी ते तंतोतंत त्याच प्रकारे ठेवले जशी मी कोनशिला घातली होती. तेथे माझी साक्ष ठेवलेली आहे, जेथे ती मी पवित्र शास्त्रातील कोऱ्या पानावर लिहिलेली होती, आणि ते पान फाडले आणि त्या कोनशिलेत ठेवले. आणि ती अजूनही तेथे ठेवलेली आहे. आणि कदाचित देवाच्या अनंत वचनामध्ये स्वर्गात तिच्या पानांवर लिहिलेली असेल. शेवटापर्यंत मला सत्यतेने उभे राहू दे.

110 प्रार्थनेसाठी आपली मस्तके आता अगदी एका मिनिटाकरिता झुकवुया. या रात्रीच्या समाप्तीत, एका अध्यायाच्या समाप्तीस किमान, जे समर्थनीय नाही. तुम्हाला दुसरे देखील घ्यावयास हवे होते, कसा तो पुढे जातो आणि मंडळीला तिच्या स्थानात स्थानापन्न करतो. कधीतरी, देवाची इच्छा असल्यास, मी तुमच्यासाठी घेईन. आता तेथे पलीकडे चटाक्काला जाण्याअगोदर, दुसऱ्या मोठ्या सभेसाठी, मला अगदी थोडासा आराम करायचा आहे. मग तेथून मी ओक्लाहोमाला जाईन.

Sermons By
विल्यम मॅरियन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे प्रचार केले गेलेले उपदेश
"...वाणी होईल त्या दिवसात..." प्रकटी. १०:७

www.messagehub.info